www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी
# युवक आधार

मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : 13 रविवार दि. 21 सप्टेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 6 RNI MAHMAR/2023/89514




# राज्यात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता

**मुंबई :** राज्यातील काही भागात मागील दोन – तीन दिवसांपासून ढगाळ वातावरण असून काही भागात हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडला. काही भागात शनिवारी पावसाच्या सरी बरसल्या. दरम्यान, पुढील चार ते पाच दिवस राज्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.हवामान विभागाने पुढील पाच दिवसांसाठी सर्वच जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. यावेळी काही भागात मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा अंदाज असून काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. दरम्यान, उत्तर अंदमान समुद्रात म्यानमारच्या किनाऱ्यालगत सोमवारपर्यंत चक्राकार वाऱ्यांची स्थिती तयार होण्याची शक्यता आहे. या वाऱ्यांच्या प्रभावामुळे २५ सप्टेंबरपर्यंत हवेचा कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. या चक्राकार वाऱ्यांपासून दक्षिण मध्य महाराष्ट्रापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा विस्तारला आहे. दक्षिण उत्तर प्रदेशापासून मराठवाड्यापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा कायम आहे.

राज्यात सर्वत्र रविवरापासून पावसाची शक्यता आहे. काही भागात मुसळधार तर काही भागात हलक्या ते मध्यम सरी बरसतील. मुंबईतही हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाचा अंदाज आहे. दरम्यान, मुंबईत मागील काही दिवस पावसाने ओढ दिल्यामुळे उकाडा सहन करावा लागत आहे. तापमानातही काहीशी वाढ झाली आहे. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात शनिवारी ३०.२ अंश सेल्सिअस, तर सांताक्रूझ येथे ३१.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. सांताक्रूझ येथील तापमान १ अंशाने अधिक नोंदले गेले.

**मेघगर्जनेसह पाऊस**

रायगड, रत्नागिरी, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव.

**हलक्या ते मध्यम सरी**

मुंबई, ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, जळगाव, कोल्हापूर, सातारा, सांगली

# इनरव्हील क्लब पनवेलतर्फे शिक्षकांचा सन्मान

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**




शिक्षक दिनाचे औचित्य साधून इनरव्हील क्लब पनवेलच्या वतीने नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयातील शिक्षकांचा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात तसेच समाजाला योग्य दिशा देण्यात शिक्षकांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याची जाणीव ठेवून हा उपक्रम राबविण्यात आला.या सोहळ्यात सीकेटी विद्यालयातील दहा शिक्षकांचा प्रमाणपत्र देऊन व त्यांच्या कार्याचा गौरव करून सन्मान करण्यात आला.

यावेळी प्रत्येक शिक्षकांना ज्ञानयात्रेचे प्रतीक म्हणून पुस्तक, प्रेरणेचे प्रतीक म्हणून पेन, आनंदाचे प्रतीक म्हणून मिठाई व मंगलमयतेचे प्रतीक म्हणून श्रीफळ प्रदान करण्यात आले. सन्मान स्वीकारताना शिक्षकांनी इनरव्हील क्लबच्या या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. उपस्थितांच्या मनात आपुलकी, आदर व परस्पर सन्मानाची भावना या कार्यक्रमातून अधिक दृढ झाली. या सोहळ्याची सांगता अल्पोपहार व समूह छायाचित्राने करण्यात आली. शिक्षक हे केवळ ज्ञानदान करणारे नसून विद्यार्थ्यांच्या जीवनाचा पाया रचणारे शिल्पकार आहेत. विद्यार्थ्यांना योग्य दिशा देऊन समाज घडविण्याचे पवित्र कार्य शिक्षक करतात. त्यामुळे इनरव्हील क्लब पनवेलने शिक्षकांचा सन्मान करत आणखी एक स्त्युत्य उपक्रम यशस्वीपणे राबविला.

# शैक्षणिक क्षेत्रातील मानाचा मुकुट : समय कॉम्प्युटर अँड कोचिंग क्लासेसचे संचालक कल्पेश राऊत,वाशिम यांना राष्ट्रीय गौरव

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

**(वाशिम)** स्थानिक पातळीवर संगणक शिक्षण क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करत असलेल्या समय कॉम्प्युटर अँड कोचिंग क्लासेस,वाशिम या संस्थेला शैक्षणिक वर्ष 2024-25 साठी भारतातील टॉप 100 संगणक प्रशिक्षण संस्थांमध्ये स्थान मिळाले आहे.

या भव्य कामगिरीची दखल घेत संस्थेला "Indian Top 100 Institution Award" या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले. हा प्रतिष्ठेचा पुरस्कार सोहळा नागपूर येथील हॉटेल नैवेद्यम ईस्टोरिया येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या सोहळ्यात 2014 मध्ये फेमिना मिस इंडिया वर्ल्ड किताब पटकावलेली सुप्रसिद्ध अभिनेत्री सायली भगत,तसेच AICPE नागपूरचे डायरेक्टर माननीय श्री. शरद जी तावारी व सौ.कविता तावारी यांच्या हस्ते हा प्रमुख सन्मान समय कॉम्प्युटर अँड कोचिंग क्लासेस,वाशिम चे संचालक कल्पेश राऊत यांना प्रदान करण्यात आला. या मानामुळे संस्थेचा लौकिक केवळ वाशिमपुरता मर्यादित न राहता राष्ट्रीय पातळीवर झळकला आहे.विद्यार्थ्यांना




दर्जेदार संगणक शिक्षण,करिअरविषयक मार्गदर्शन व अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना मिळालेली ही राष्ट्रीय पातळीवरील दखल संस्थेसाठी व वाशिमकरांसाठी अभिमानाची बाब ठरली आहे..

# धोदाणी येथे रस्त्यांचे सर्वेक्षण, वृक्षारोपण, आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि देशाचे पंत्रप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत सेवा पंधरवडा राविण्यात येत आहे. या काळात महसूल विभागाच्या वतीने विविध शिबिरे तसेच उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्यानुसार छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान पनवेल तालुक्यात राबवण्यात येत आहेत.


या उपक्रमाअंतर्गत पनवेल तालुक्यातील धोदाणी येथे ग्रामीण गावातील रस्ते, गाडी मार्ग, पाय रस्ता, शेत पाणंद रस्त्यांचे सर्वेक्षण तसेच वृक्षारोपण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी झाले. या कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी पवन चांडक, अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजेंद्र पाटील, अमित जाधव, नेरे मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, राज पाटील, सुनिल पाटील, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, सरपंच शांताराम चौधरी, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, माजी सरपंच राजा भोईर यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी चिंचवाडी येथे वृक्षारोपण करण्यात आले.




# वीर वाजेकर महाविद्यालयाच्या वतीने 'सागरी किनारा स्वच्छता' मोहीम संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**कॉलेजकट्टा/आरती सुरवसे**

दिनांक-20 सप्टेंबर 2025 रोजी राष्ट्रीय सेवा योजना,राष्ट्रीय छात्र सेना फुंडे कॉलेज व के.डी. एस.कॉलेज, यु.एस.महाविद्यालय सागर विचार मंच, कंदळवन फाऊंडेशन सेल रायगड,नागरी संरक्षण सेवा दल उरण फ्रेंड्स ऑफ नेचर यांच्या संयुक्त विद्यमाने उरण येथील नागाव समुद्र किनारा स्वछता करण्यात आली.तीनही महाविद्यालयातून जवळजवळ 300 विद्यार्थी उपस्थित होते.नागरी सेवादल फ्रेंड्स ऑफ नेचर व इतर सामाजिक संस्थेचे 100 व्यक्ती कांदळवन संरक्षण



दलाचे 25 जवान व साईश्वरी मॅडम, नागाव ग्रामपंचायतीचे सरपंच नरेंद्र गायकवाड, म्हातवली ग्रामपंचायतीचे सदस्य यांनी उपस्थित राहून समुद्र किनारा स्वच्छता करण्यात आली.

यावेळी डॉ.आमोद ठक्कर प्रभारी प्राचार्य,वीर वाजेकर कॉलेज, फुंडे यांनी आपल्या मनोगतातून सागर आपल्या भविष्यातील पर्यावरण संवर्धनासाठी व भविष्यातील अन्न सुरक्षितता साठी कसे आवश्यक आहे ते वैज्ञानिक दृष्ट्या विद्यार्थ्यांना , समजावून सांगितले, शासनाच्या आदेशापेक्षा आपणच महिन्याच्या दर शनिवारी सागर किनारा स्वच्छता करुयात त्यात सर्वांनी सहभागी होऊया असे आवाहन केले . डॉ.दत्ता हिंगमिरे, विभागीय समनव्यक राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा रायगड यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

सागर विकास मंच ह्यांच्या मार्फत हात मोजे, मास्क व अल्पोपहार उपलब्ध करून देण्यात आला होता म्हातवली ग्रामपंचायती कचरा संकलनासाठी निकेतन रमेश ठाकूर( फ्रेंड्स ऑफ नेचर सामाजिक संस्था, चिरनेर) यांचेही सहकार्य लाभले.प्रा. राम गोसावी,प्रा.बळीराम पवार कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना,फुंडे कॉलेज, महाविद्यालयातील सकाळ सत्रातील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते.तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होते.




भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपा नेते ऍड.आस्वाद पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिष्टचिंतन करून त्यांना उदंड आयुष्य, उत्तम आरोग्य आणि यशस्वी राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.
( दैनिक युवक आधार)

# महात्मा फुले महाविद्यालयात मुंबई विद्यापीठाच्या झोन क्र. १ च्या आंतरमहाविद्यालयीन महिला कबड्डी स्पर्धा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: रयत शिक्षण संस्थेचे, महात्मा फुले कला, विज्ञान वाणिज्य महाविद्यालयाच्या प्रांगणात मुंबई विद्यापीठाच्या झोन क्र.१ च्या आंतर महाविद्यालयीन महिला कबड्डी स्पर्धा पार पडल्या. या आंतरमहाविद्यालयीन महिला कबड्डी स्पर्धांच्या उद्घाटन समारंभाची सुरुवात महाविद्यालयाच्या स्वरमयी ग्रुपच्या रयतगीत व विद्यापीठ गीताने झाली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी प्रास्ताविक व उपस्थित पाहुण्याचा परिचय करून दिला. रयत शिक्षण संस्थेचा आढावा घेत रयत शिक्षण संस्था ही आशिया खंडातील सर्वात मोठी असून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी संस्थेची स्थापना केली, असे सुतोवाच त्यांनी केले. महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पनवेल हे मुंबई विद्यापीठातील एक आदर्श महाविद्यालय




म्हणून नावलौकिकास आले आहे. तसेच महाविद्यालयास गुणवत्तेबरोबरच विविध स्तरावर प्राप्त झालेल्या पुरस्कारांचा आढावाही त्यांनी घेतला.

सी.बी.डी.बेलापूर विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त व तीन वेळा कुस्ती खेळामध्ये महाराष्ट्र केसरी पुरस्कार प्राप्त विजय चौधरी यांनी प्रथम रयत शिक्षण संस्था आणि महाविद्यालयाच्या चांगल्या नियोजनाबद्दल कौतुक केले. आपल्या मनोगतात त्यांनी त्यांच्या कॉलेजजीवनातील व खेळाविषयी आठवणींना उजाळा दिला. आपण सर्वसामान्य कुटुंबातून आलेलो आहोत. आपल्या आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करताना आपण खेळाडू म्हणून अहोरात्र मेहनत केली पाहिजे. त्यातून जीवनाला एक शिस्त प्राप्त होते. कठीण प्रसंगावरही मात करता येते. प्रामाणिकपणे कष्ठ व खेळावर प्रेम केल्यास यश निश्चित मिळते. खेळाबरोबर आपल्याला अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. आपली संगत चांगल्याशी असावी. खेळामध्ये हरलो म्हणून थांबायचे नसते, असा कानमंत्रही त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिला. आज खेळामध्ये देखील राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर करिअरच्या चांगल्या संधी उपलब्ध असून त्याचा लाभ घेण्याचे आव्हान त्यांनी खेळाडूंना केले. सर्व खेळाडूंना शुभेच्छा देऊन त्यांनी महिला कबड्डी खेळाडूंना प्रोत्साहित केले. महाविद्यालयाच्या वतीने वैभव ढवळे व कबड्डी खेळाडू तेजा सपकाळ यांचा विशेष सत्कार क
रण्यात आला.

मुंबई विद्यापीठाच्या झोन क्र. १ च्या वतीने संपन्न झालेल्या आंतरमहाविद्यालयीन महिला कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक महर्षी दयानंद कॉलेज, परळ यांनी पटकविला. द्वितीय क्रमांक महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पनवेल यांनी पटकविला. तृतीय क्रमांक आर. ए. डी. ए. व्ही कॉलेज, भांडूप यांनी पटकविला तर चतुर्थ क्रमांक गुरूनानक खालसा महाविद्यालय यांना प्राप्त झाला.

# रविवारी पनवेलमध्ये "नमो युवा रन" चे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्ह्याच्या वतीने रविवार दिनांक २१ सप्टेंबर रोजी सकाळी ०६ वाजता पनवेल मधील वडाळे तलाव येथे 'स्वस्थ आणि नशा मुक्त भारताच्या निर्मितीसाठी' या शीर्षकाखाली "नमो युवा रन" चे आयोजन करण्यात आले आहे.



या रनचे उदघाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी आमदार सुरेश लाड यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, एड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, चारुशीला घरत यांची प्रमुख उपस्थिती असणार असून प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, कळंबोली मंडल अध्यक्ष अमर पाटील, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत, पनवेल उत्तर मंडल अध्यक्ष दिनेश खानावकर, पनवेल पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पनवेल दक्षिण मंडल अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल पश्चिम मंडल अध्यक्ष रुपेश धुमाळ, उरण शहर अध्यक्ष प्रसाद भोईर, उरण ग्रामीण अध्यक्ष धनेश गावंड, खालापूर पश्चिम अध्यक्ष प्रवीण मोरे, खालापूर पूर्व अध्यक्ष सनी यादव, कर्जत शहर अध्यक्ष राजेश लाड, नेरळ मंडल अध्यक्ष नरेश मसणे, कर्जत ग्रामीण अध्यक्ष दिनेश रसाळ आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# यकृत दान करून पत्नींनी वाचविले एकमेकांच्या पतींचे प्राण

## नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये यशस्वी स्वॅप लिव्हर प्रत्यारोपण

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई:** रक्तगट न जुळल्याने अवयव प्रत्यारोपणात अनेकदा अडचणी निर्माण होतात. अशाच एका प्रकरणात दोन पुरुष रुग्णांना यकृत प्रत्यारोपणाची गरज होती ; परंतु त्यांच्या पत्नींचे रक्तगट जुळत नव्हते. यावर मार्ग काढत स्वॅप यकृत प्रत्यारोपण म्हणजे दोन्ही रूग्णांच्या बायकांनी आपले यकृत एकमेकांच्या पतीला दान करून पतींचे प्राण वाचविण्यात यशस्वी झाल्या. खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये हे यशस्वी प्रत्यारोपण करण्यात आले. *डॉ शरणकुमार नरुटे(संचालक – यकृत प्रत्यारोपण आणि एचपीबी शस्त्रक्रिया, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, खारघर)* यांच्या नेतृत्वाखालील यकृत रोग, एचपीबी शस्त्रक्रिया आणि प्रत्यारोपण टीमने हे स्वॅप यकृत प्रत्यारोपण यशस्वीरित्या पार पाडले. *चिपळूण येथील व्यापारी ५३ वर्षीय श्री. महेंद्र गमरे आणि नांदेडमध्ये कार्यरत असलेले ४१ वर्षीय रुग्ण श्री. पवन ठिगळे हे शेवटच्या टप्प्यातील यकृताच्या आजाराशी झुंजत होते.* दोन्ही रुग्णांना कावीळ, जलोदर, अवयवांना सूज येणे, पोट फुगणे, भूक न लागणे आणि स्नायूंची झीज होणे यासारख्या समस्या होत्या. एका वर्षापेक्षा जास्त काळ ते प्रत्यारोपणाची वाट पाहत होते. दिवसेंदिवस त्यांची प्रकृती ढासळत चालली होती. *श्री. महेंद्र गमरे यांनी नवी मुंबईतील खारघर येथील मेडिकव्हर



हॉस्पिटलमध्ये, तर श्री. पवन ठिगळे पुण्यातील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होते.* *डॉ शरणकुमार नरुटे(संचालक – यकृत प्रत्यारोपण आणि एचपीबी शस्त्रक्रिया) सांगतात की* त्यांच्या पत्नी त्यांच्या यकृताचा काही भाग दान करण्यास उत्सुक होत्या परंतु प्राप्तकर्ता आणि दात्याचे सखोल मूल्यांकन केल्यानंतर, ते जुळत नसल्याचे दिसून आले. मात्र हे जोडपे स्वॅप प्रत्यारोपणासाठी पात्र ठरले . ज्या रुग्णांच्या कुटुंबात अवयव दात्यांचे रक्तगट जुळत नसल्याने प्रत्यारोपण करण्यात अडचणी येतात, अशा रुग्णांसाठी स्वॅप प्रत्यारोपण हे आशेचा किरण ठरते. यामध्ये दोन रुग्ण ज्यांना एकाच प्रकारच्या अवयव प्रत्यारोपणाची आवश्यकता असते, अशा रुग्णांच्या कुटुंबातच अवयवांची देवाणघेवाण केली जाते. यालाच स्वॅप प्रत्यारोपण असे म्हटले जाते. रुग्ण श्री महेंद्र गमरे यांची पत्नी सौ जुही महेंद्र गमरे हिने तिच्या यकृताचा एक भाग रुग्ण श्री. पवन ठिगळे यांना दान केला, तर रुग्ण श्री. पवन ठिगळे यांच्या पत्नीने तिच्या यकृताचा भाग रुग्ण श्री महेंद्र गमरे यांना दान केला. दोन दाते आणि दोन प्राप्तकर्त्यांवर एकाच वेळी १० तासांच्या आत प्रत्यारोपण करण्यात आले. प्राप्तकर्त्यांना ११ दिवसांनी घरी सोडण्यात आले तर दात्यांना ७ दिवसांत घरी सोडण्यात आले. *डॉ. नरुटे पुढे सांगतात की,* कुटुंबातील कोणाचाही रक्तगट समान नव्हता. यामुळे यकृत प्रत्यारोपणात विलंब झाला. दोन्ही रुग्ण गंभीररित्या आजारी होते आणि त्यांना वारंवार रुग्णालयात दाखल करावे लागत होते मात्र स्वॅप प्रत्यारोपणामुळे हे प्रत्यारोपण शक्य झाले आणि या रुग्णांचा जीव वाचला. भूल देण्यापासून ते प्रत्यारोपण पूर्ण करण्यापर्यंत चारही शस्त्रक्रिया एकाच वेळी चार ऑपरेटिंग रूम मध्ये करणे हे सर्वात मोठे आव्हान होते. दोन्ही रुग्णांना प्रत्यारोपणानंतर एक पोस्टऑपरेटिव्ह कोर्स देण्यात आला आहे. यकृत प्रत्यारोपणात पात्र दात्यांची नेहमीच कमतरता असते ज्यामुळे प्रगत यकृत रोग असलेल्या रुग्ण मृत्यूस बळी पडतात. रक्तगट किंवा यकृताचा आकार जुळत नसल्यामुळे ते त्यांचे यकृत दान करू शकत नाहीत अशा प्राप्तकर्त्यांसाठी स्वॅप लिव्हर ट्रान्सप्लांट जीवनरक्षक ठरते. चार ऑपरेटिंग रूममध्ये १० तासांहून अधिक काळ हे अत्यंत आव्हानात्मक शस्त्रक्रिया पार पाडण्यात आली आहे. अशा शस्त्रक्रियांपूर्वी रुग्णांचे समुपदेशन फार महत्त्वाची भूमिका बजावते. हेप्टो–रेनल सिंड्रोम म्हणजेच गंभीर यकृताचा आजार असलेल्या रुग्णांमध्ये मूत्रपिंड निकामी होणे, हेप्टो–पल्मोनरी सिंड्रोम (कमी ऑक्सिजन पातळी आणि प्रगत यकृताचा आजार असलेल्या लोकांमध्ये दम लागणे), पोर्टल हायपरटेन्शन, हेपॅटिक एन्सेफॅलोपॅथी, व्हेरिसियल ब्लीडिंग किंवा मृत्यू यासारख्या गुंतागुंत निर्माण होऊ शकतात. दोन्ही जोडप्यांनी मेडिकव्हर रुग्णालयाच्या संपुर्ण टिमचे आभार मानले. देशात अवयवदानाचे प्रमाण अजूनही कमी असल्याने, स्वॅप प्रत्यारोपण हे रुग्ण व त्यांच्या कुटुंबियांसाठी आशेचा किरण ठरत आहे.

# कोमसापच्या सन्मानाच्या विश्वस्तपदी साहित्यरत्न रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील यांची नियुक्ती !!

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

कोकणातील कोकण मराठी साहित्य परिषद ही सुप्रसिद्ध साहित्य परिषद आहे.त्या परिषदेच्या सन्मानाच्या विश्वस्त पदी कोकणातील लाडके व्यक्तिमत्त्व साहित्यरत्न रायगडभूषण प्रा. एल.बी.पाटील यांना नियुक्त करण्यात आले. ते कोमसापच्या स्थापनेपासून संघटनेत विविध पदांवर कार्यरत राहिलेले आहेत.२१वर्षे शाखाध्यक्ष,सोबत१८वर्षे जिल्हाध्यक्ष, ३वर्षे कार्याध्यक्षपद त्यानंतर विद्यमान जनसंपर्क प्रमुख म्हणून सेवा केली आहे. सेवा काळात कोकणातील साहित्यिकांचे आवडते व्यक्तिमत्त्व राहिलेले आहेत.आज






त्यांना कोमसापच्या सन्मानपदी त्यांची पद्मभूषण मधु मंगेश कर्णिक, कोमसाप कार्यकारिणी, आणि कोमसाप जनरल सभेने त्यांना नियुक्त करण्यात आल्याने उपस्थितांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.हा कार्यक्रम कुडाळ (सिंधुदुर्ग) येथे कोमसाप अध्यक्ष नमिता कीर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

कोमसाप जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ आणि जिल्हा प्रतिनिधी गणेश कोळी यांनी सांगितले की एल.बी.सरांचे सातत्याने साहित्य लेखन, कविसंमेलनात योग्यस्थानी सहभाग,कवींना मार्गदर्शन, सोबत सामाजिक कार्यात ते सहभागी राहिले आहेत.आपल्या कविमित्रांच्या,मा.आ.विवेक पाटील,खोपटेग्रामस्थ इत्यादीच्या सहकार्याने खोपटेच्या सात गावांना नळपाणी योजना आणणे,सेझ विरोधात --उरण मैदानासाठी द्रोणागिरी स्पोर्ट्स सोबत राहून सिडको विरोधात कवींचा जागर करणे,शहरातील लेडिजबार बंद करणे, आगरी समाजातील दारूच्या मांडवप्रथे विरोधात ४५ वर्षे लढा चालू ठेवणे, पतीच्या मृत्यूनंतर विधवांचे सौभाग्यालंकार उतरवू नयेत त्याबाबत मागील २० वर्षांपासून त्या विरोधात प्रचार करणे,उरणातील प्रत्येक चळवळीत सहभागी होणे,आगरी बोलीच्या प्रचारात अग्रस्थानी राहणे इत्यादी कामे ते करीत राहिले आहेत. त्याचा आम्हाला अभिमान असल्याचे कोमसाप ज गुंजाळ, कोळी यांनी आमच्या प्रतिनिधीपुढे मत व्यक्त केले आहे.

# उरण मधील रिक्षा चालक नंदकुमार सवंगडे यांचा प्रामाणिकपणा : पैशांची बॅग केली परत.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

प्रामाणिकपणा म्हणजे सत्य बोलणे,दिलेला शब्द पाळणे, आणि योग्य मार्गाने वागणे, हे एक जीवनातील महत्वाचे नैतिक मुल्य आहे. परंतू आजकाल प्रामाणिकपणा लोप पावत चालला आहे. लबाडीचा शिक्का घेऊनच काही लोक समाजात वावरताना दिसत आहेत.



परंतु आजही समाजात प्रमाणिक पणा जीवंत असल्याचा प्रत्यय दिला आहे तो उरण मधील रिक्षा चालक नंदकुमार सवंगडे रहाणार बोकरविडा यांनी. शुक्रवार दिनांक १९ सप्टेंबर रोजी सायंकाळी शारंगधर जनरल हॉस्पिटल कोटनाका उरण येथे महादेव पाटील हे गृहस्थ डॉ.सत्या ठाकरे यांच्या कडे एक पेशंट म्हणून गेले होते. डॉ.सत्या ठाकरे यांनी महादेव पाटील यांना पायाची सोनोग्राफी करून घेण्यासाठी पाठवले .परंतु ते ज्या रिक्षात बसले होते, त्या रिक्षात घाईगडबडीमध्ये आणि पायाच्या त्यांच्या त्रासामुळे त्यांची पैशांची बॅग हि रिक्षामध्येच विसरून ते खाली उतरले आणि हॉस्पिटलमध्ये आले .काही वेळाने त्यांच्या लक्षात आले की आपण बॅग रिक्षात ठेवली .आणि ती तिथेच विसरून राहिली या गोष्टीचे त्यांना खूप टेन्शन आले. एक तर आजाराने त्रस्त आणि त्यात पैशांची बॅग विसरले या गोष्टीचा त्यांची मनस्थिती पुर्णपणे ढासळली. डॉक्टर सत्या ठाकरे यांनी त्यांना धीर दिला. रिक्षा बद्दल माहिती ,नंबर विचारले पण त्यांना ते काही आठवत नव्हते, अशी द्विधा मनस्थिती त्यांची झाली होती आणि त्यांना काही सुचत नव्हते.

आणि त्याच वेळात रिक्षा चालक नंदकुमार सवंगडे हॉस्पिटलमध्ये आले आणि त्यांनी ती महादेव पाटील यांची पैशांची भरलेली बॅग या बॅगेमध्ये ३५ ते ४०'हजार रोकड होती ती त्यांच्या स्वाधीन केली .या रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा बघून डॉक्टर डॉक्टरां कडील इतर पेशंट , तीथे असलेले लोक अवाक झाले ,भारावून गेले.

माणसाची नैतिकता प्रामाणिकपणा द्वारे ओळखली जाते. नंदकुमार यांच्या सारखी समाजात सर्व लोक प्रामाणिकपणे वागले तर समाज एक आदर्श समाज होईल.असा हा प्रामाणिकपणा स्वभावातच असावा लागतो.आज समाजात नंदकुमार सवंगडे यांच्या सारखी प्रामाणिक, सच्च्या मनाची माणसे आहेत आणि अशा माणसांची समाजाला गरज हि आहे. म्हणून हा समाज आदर्श वादावर चालत आहे,असे म्हणायला काहीच हरकत नाही.

# श्री छत्रपती शिक्षण संस्थेची 56 वी वार्षिक सभा खेळीमेळीत संप्पन्न

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

श्री छत्रपती शिक्षण संस्थेची शनिवार दि. 20 सप्टेंबर रोजी दुपारी दोन वाजता श्री. छत्रपती हायस्कूलच्या सभागृहात दुपारी दोन वाजता चालू होऊन सचिव अशोक मोरे यांनी प्रास्ताविक सभेचा वृतांत वाचण्यात आला.या सभेसाठी अध्यक्ष म्हणून पृथ्वीराज बापू जाचक यांची सर्वानुमते ठराव संतोष चव्हाण यांनी मांडला.या ठरावास राजाराम रायते यांनी सर्वानुमते अनुमोदन देण्यात आले.सणसरचे युवा नेते विक्रम भैय्या निंबाळकर यांनी जुनिअर कॉलेजच्या विज्ञान शाखेतील नवीन अभ्यासक्रम आणि सर्व शाखेमधील विद्यार्थी संख्या घटत आहे त्याबद्दल आपले खंत व्यक्त केले.भाजपा नेते तानाजी थोरात यांनी अनेक विषय मांडून शिक्षण संस्थेच्या सचिव मानधनांबाबत व इतर विविध विषयावर अध्यक्ष जाचक बापू यांना सूचना केल्या. शेतकरी कृती समितीचे सदस्य विशाल निंबाळकर यांनी अहवालातील प्रवास खर्च कोर्ट केसेस बाबत सचिव यांना विचारणा करून सर्व केसेस तडजोड करून निकाली काढण्यात याव्यात म्हणून आपल मत व्यक्त केले.यावेळी श्री छत्रपती शिक्षण संस्था अध्यक्ष पृथ्वीराज बापू जाचक यांनी सभासद यांना अचूक योग्य समर्पित उत्तरे दिल्यामुळे ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली यावेळी माजी अध्यक्ष प्रशांत दादा काटे यांनी सुद्धा त्यांच्या काळातील उदभावणारे सूचनानां योग्य उत्तर देण्यात आली.या सभेसाठी विद्यमान संचालक माजी संचालक सर्व शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक इतर कर्मचारी उपस्थित होते.






पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथे आष्टी येथील नाभिक संघटनेचे तालुकाध्यक्ष तथा मा नगरसेवक प्रवीण कदम,आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम,भाजपचे माजी आष्टी शहराध्यक्ष बाबुराव कदम,बाबासाहेब कदम,जालिंदर लष्कर यांनी सदिच्छा भेट दिली असता त्यांचे स्वागत करताना महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे सोलापूर युवक कार्याध्यक्ष दत्ता भुसे,वंचितचे नेते बिरा मोटे सर,महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे पंढरपूर तालुका उपाध्यक्ष सुनिल माने, प्रगतशील बागायतदार रविंद्र देशमुख, कासेगाव ग्रामपंचायत माजी सदस्य सिद्धार्थ खिलारे,शरद जाधव,नागेश जाधव,महादेव भोसले,बाबुराव डोईफोडे,वैभव भुसे यांनी स्वागत केले यावेळी आदी दिसत आहेत( मारुती सत्रे युवक आधार )

# प्रॉपर्टी मंत्राचा शानदार ‘अवॉर्ड सोहळा’ आणि ‘चिकन मंत्रा’चा शुभारंभ

**दैनिक युवक आधार**
**खांदा कॉलनी**

प्रॉपर्टी मंत्रा कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर किशोर जालिंदर माने आणि त्यांच्या पत्नी अश्विनी किशोर माने यांच्या वतीने “पुरस्कार हा सोहळा १४ सप्टेंबर २०२५, रविवार रोजी हॉटेल रेड विंग येथे मोठ्या उत्साहात पार पडला.



या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेंद्र वाघमारे आणि वंदना पुत्री पूजा मुरलीधर जाधव यांनी केले. या सोहळ्यात विविध क्षेत्रांतील मान्यवरांना त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सन्मानित करण्यात आले. 'नशा मुक्त भारत' उपक्रमातील योगदानासाठी नितीन कांबळे, रिअल इस्टेटमध्ये यूएसए युनिव्हर्सिटीमधून एमबीए केल्याबद्दल डॉ. पराग घुमरे, समाजसेवेसाठी मनोज गायकवाड, योग क्षेत्रातील योगदानासाठी योगाचार्य भारती घुमरे आणि प्रॉपर्टी मंत्रासाठी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल स्वरा पोसम यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

याच सोहळ्यात किशोर जालिंदर माने आणि अश्विनी किशोर माने यांनी त्यांच्या दुसऱ्या नवीन कंपनीचे, "चिकन मंत्रा" चे उद्घाटन केले. "चिकन मंत्रा" द्वारे ग्राहकांना आता फ्रेश आणि आरोग्यदायी चिकन उपलब्ध होणार आहे. तसेच, येत्या काही महिन्यांत वाशी ते पनवेल दरम्यान कंपनी २०० आउटलेट सुरू करण्याच्या तयारीत आहे.

या कार्यक्रमात ट्रीन एस एल आर प्रॉडक्शन' च्या टीम मेंबर्स आणि कलाकारांनाही आमंत्रित करण्यात आले होते. यात म्युझिक अल्बम आणि हिंदी हॉरर वेब सिरीजचे कलाकार आणि टीम मेंबर्स व्यासपीठावर उपस्थित होते. यात अल्बममधील कलाकार ग्यानप्रीत आर जे, नायिका संघवी सुमन,सचिन तांडेल, कास्टिंग डायरेक्टर कृष्णा वर्मा, मुख्य पाहुण्या सिने तारिका शीतल साळुंखे, बालकलाकार यश्वी पोसम,दिव्या बोबडे, समृद्धी पाटील,अर्णवकुमार, प्रकाश सुरवसे, नृत्यांगना हर्षिता कदम, अकलूज लावणी महोत्सवाची २०२४ची विजेती लावणी क्वीन भैरवी मिस्त्री यांचा समावेश होता. तसेच, अलका ब्युटी पार्लरच्या संचालिका अलकाताई कोळी–तोडणकर, माजी प्राचार्य कृष्णकांत पाटील सर, कुसुम कोठेकर, ग्रामपंचायत ओवळेचे सदस्य राज सदावर्ते,मानवी हक्क संरक्षण फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ मुनीर तांबोळी, बिनिता मॅडम, प्रियांका लौगडे, रमेश भिंगारदिवे, लक्ष्मण झोरे, विवेक गायकवाड,नीलिमा विजय झिंजे, निर्माते राजेंद्र देशमुख विश्वासराव उपस्थित होते. बाल कलाकारांचे स्वागत आयुष किशोर माने यांच्या हस्ते करण्यात आले. प्रॉपर्टी मंत्राचे सदस्य गजानन कांबळे यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यात महत्त्वाचा वाटा उचलला. या सोहळ्यात प्रॉपर्टी मंत्राचा दुसरा लकी ड्रॉ देखील काढण्यात आला.

कार्यक्रमाची शोभा वाढवण्यासाठी लावणीची राणी भैरवी मिस्त्री यांनी 'लावणी इश्काची' या नृत्यमय कार्यक्रमातून तडाखेबाज लावणी सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

# चिरनेर ता. उरण येथील आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी धडपडणाऱ्या अष्टपैलू शिक्षकाचा 'आदर्श शिक्षक ' पुरस्काराने गौरव

**दैनिक युवक आधार**
**उमाकांत पानसरे**
**उरण प्रतिनिधी**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प आणि लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट 3231ए4 यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 18 सप्टेंबर सकाळी 11 वाजता आदिवासी आश्रम शाळा पडसरे ता.पेण जि. रायगड येथे पार पडलेल्या समारंभात चिरनेर येथील आश्रम शाळेतील अष्टपैलू व्यक्तिमत्व असणाऱ्या श्री महादेव चंद्रकांत डोईफोडे या शिक्षकाचा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी श्री आत्माराम धाबे सर सहाय्यक शिक्षण प्रकल्प अधिकारी श्री मारुती गायकवाड सर लायन संजय सूर्यवंशी लायन श्री यशवंत चित्रे जिल्हा शिक्षण समिती सदस्य व सर्व मुख्याध्यापक यांच्या प्रमुख उपस्थितीत 'आदर्श शिक्षक ' या पुरस्काराने गौरव करण्यात आला. पुष्पगुच्छ शाल आणि प्रमाणपत्र अशा स्वरूपात त्यांचा सन्मान करण्यात आला. याआधीही दैनिक पुढारी चा ज्ञान पंढरीचा वारकरी तसेच डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श शिक्षक पुरस्कार महात्मा गांधी पीपल्स अवॉर्ड कौन्सिल महाराष्ट्र यांचे तर्फे देण्यात आला आहे त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन आदिवासी विकास आयुक्त नाशिक यांचेकडून आदिवासी समाज प्रगतीसाठी धडपडणाऱ्या शिक्षकांसाठी ' पिचकूड ' या पुस्तकात शिक्षणाच्या ज्ञानगंगा म्हणून




सरांची यशोगाथा प्रसिद्ध झाली आहे . चिरनेर उरण तालुक्यातील सर्व सामाजिक क्षेत्रातून श्री महादेव चंद्रकांत डोईफोडे सरांच्या या पुरस्काराने आनंदी वातावरण निर्माण झाले आहे. समाजातील सर्व स्तरातून प्रतिष्ठित नागरिकांकडून सरांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# आरोग्य आणि आनंद घराघरांत पोहोचविणार अपोलोची जागतिक चळवळ





### 1.9 मिलियन व्यक्तींच्या आयुष्यात अपोलो फाउंडेशनच्या सामाजिक कार्यक्रमांनी प्रभाव घडवून आणला

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई, वार्ताहर**

२० सप्टेंबर २०२५: अपोलो हॉस्पिटल्सने आपला ४२ वा वर्धापन दिन साजरा केला आहे. या ४२ वर्षात २०० मिलियनपेक्षा जास्त आयुष्यांमध्ये अपोलो हॉस्पिटल्सने परिवर्तन घडवून आणले, १८५ पेक्षा जास्त देशांमध्ये विश्वास संपादन केला आणि भारतभरातील १९ हजार पेक्षा जास्त पिनकोड्सना आपल्या सेवासुविधा पोहोचवल्या आहेत. अपोलोने भारतातील पहिले कॉर्पोरेट हॉस्पिटल १९८३ साली सुरु केले. गेल्या चार दशकात ५१ लाखांहून जास्त शस्त्रक्रिया आणि २७ हजार अवयव प्रत्यारोपणे करून अपोलोने आरोग्यसेवा क्षेत्रात आमूलाग्र क्रांती घडवून आणली. अपोलोने ११ लाखांहून जास्त प्रोफेशनल्सना प्रशिक्षित करून देशात कुशल आरोग्यसेवा मनुष्यबळ निर्माण केले. डॉ प्रताप सी. रेड्डी, चेयरमन, अपोलो हॉस्पिटल्स ग्रुप म्हणाले,"१९८३ साली जेव्हा अपोलोने सुरुवात केली तेव्हा केवळ एक हॉस्पिटल नव्हे तर एका चळवळीचा प्रारंभ झाला. गेल्या चार दशकांत या चळवळीला उत्तरोत्तर बळ मिळत गेले, २०० मिलियन लोकांच्या आयुष्यात अपोलोने आपला प्रभाव निर्माण केला, १८५ देशांमध्ये विश्वास संपादन केला आणि आरोग्यसेवा क्षेत्रात काय शक्य आहे त्याची नवी व्याख्या रचली. जागतिक दर्जाची देखभाल सहजपणे उपलब्ध व्हावी आणि भविष्यासाठी नेहमी सज्ज असावे हे आमचे व्हिजन आहे. जागतिक मंचावर भारत स्थान मिळवत असताना, अपोलो देशाच्या वाटचालीला चालना देईल, आपला समाज अधिकाधिक निरोगी आणि सुदृढ व्हावा यासाठी प्रयत्न करत राहील, वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या सीमा रुंदावत राहील आणि हे सुनिश्चित करेल की, प्रत्येक कुटुंब आपल्या भविष्याकडे आशेने, निरोगीपणे आणि आनंदाने पाहू शकेल." भारतामध्ये आयुर्मान आणि आरोग्य मानके यामध्ये सातत्याने वाढ होत आहे व अपोलोची वाटचाल त्याच्याशी खूप जवळून निगडित आहे. आरोग्य उपचार व देखभालीसाठी परदेशात जावे लागण्याचे प्रमाण कमी करून, सर्व क्षेत्रांमध्ये क्लिनिकल मापदंड उंचावून आणि दर्जेदार आरोग्यसेवा लाखो लोकांपर्यंत पोहोचवून, अपोलोने दीर्घायुष्य, आजारातून बरे झाल्यानंतर दीर्घकाळ जिवंत राहण्याचा दर आणि विश्वसनीय आरोग्य देखभाल डेस्टिनेशन म्हणून भारताची प्रतिष्ठा उंचावली आहे. डॉ प्रीता रेड्डी, एक्झिक्युटिव्ह व्हाईस चेयरमन, अपोलो हॉस्पिटल्स ग्रुप म्हणाल्या,"राष्ट्राची ताकद तेथील लोकांच्या आरोग्यामध्ये असते. भारतातील डॉक्टर, नर्सेस आणि देखभाल करणाऱ्या व्यक्ती हे देशाच्या प्रगतीचे मूक शिल्पकार आहेत. अपोलोमध्ये आम्ही फक्त हॉस्पिटल्स नाही उभारली तर मनुष्यबळ निर्माण केले. जेव्हा आम्ही लोकांमध्ये गुंतवणूक करतो तेव्हा आम्ही सन्मान, कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्याची ताकद आणि देशाच्या भविष्यामध्ये गुंतवणूक करतो." अपोलोने भारतामध्ये वैद्यकीय क्षेत्राचा चेहरामोहरा बदलावला आहे. दक्षिण आशियातील पहिले प्रोटॉन कॅन्सर सेंटर, भारतातील पहिले एआय-प्रिसिजन ऑन्कोलॉजी सेंटर आणि या क्षेत्रातील पहिले सायबरनाईफ® रोबोटिक रेडिओसर्जरी सिस्टीम अशा अनेक गोष्टी भारतात प्रथमच करण्याचा मान मिळवला आहे. आज अपोलो २८ प्रगत रोबोटिक प्लॅटफॉर्म्सचे, एआय-पॉवर्ड कार्डिओव्हस्क्युलर रिस्क प्रिडिक्शन आणि प्रगत रियॅलिटी-असिस्टेड सर्जरीजचे नेतृत्व करत असून भविष्यातील औषधोपचार आज उपलब्ध करवून देत आहे.

## मुखेड मधील दिव्यांग व्यक्तीला फसवणुक करून लुबाडणारी टोळी शहरात कार्यरत वेळेवर सावध व्हा

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**



**नांदेड** - मुखेड तालुका व शहरात ग्रामीण भागातील दिव्यांग व्यक्ती किंवा नातेवाईक शासनाच्या विविध योजना मिळवण्यासाठी धडपडत असताना दिव्यांगाचे प्रमाणपत्र वैद्यकीय विभागाकडून काढुन देतो म्हणुन हजारो रुपयाची माया उकळली जात असुन दिव्यांग व्यक्तींना दिव्यांग असल्याचे वैद्यकीय विभागाचे खोटे प्रमाणपत्र दिल्या जात आहे.सदर प्रमाणपत्र शासनाच्या योजनेसाठी वापरात आणल्यावर प्रमाणपत्रावरील क्युआर कोड ओपनच होत नाही व दिव्यांगाची नोंद नसल्याचे दिसुन येत आहे.

या सर्व प्रकारात शहरातील ठकसेन वृत्तपत्र प्रतिनिधि व वैद्यकीय क्षेत्रातील काही महाठग चौकशी केल्यास उघडे पडतील याबाबत सबळ पुरावे उपलब्ध असुन आतापर्यंत दिव्यांगाचे वैद्यकीय प्रमाणपत्र काढलेल्या लाभार्थी दिव्यांगांनी तात्काळ आपले प्रमाणपत्र ऑनलाईन पडताळणी करून घ्यावे व फसवणुक करणाऱ्या अशा टोळीपासून सावध राहण्याचे आवाहन शहर काँग्रेस अध्यक्ष हणमंत नारनाळीकर यांनी केले आहे.

## मूदगल येथे ग्रामसभेत विविध विषयांवर चर्चासत्रे

**दैनिक युवक आधार**
**(तालुका प्रतिनिधी:अशोक नवघरे)**

पाथरी तालुक्यातील मुदगल येथील ग्रामपंचायत कार्यालय येथे सरपंच लक्ष्मीकांत तिडके यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात विशेष ग्रामसभा घेण्यात आली या ग्रामसभेत विविध विषयांवर चर्चासत्रे करण्यात आले यावेळी ग्रामविकास अधिकारी मस्के उपसरपंच रामेश्वर नवघरे खंडु नवघरे बाळासाहेब पाटील राजेश घोडके रामेश्वर सुरवसे अंगणवाडी सेविका आरोग्य सेविका व यावेळी महिलांची संख्या लक्षणीय होती यावेळी प्रकाश रोडे यांनी ग्रामसभेत मुख्यमंत्री समृध्दी पंचायतराज अभियान बाबत सविस्तर माहिती दिली आणि विशेषतः मुदगल येथील महिलांनी या ग्रामसभेत अवैध धंदे बंद करण्याची मागणी केली आणि यावेळी स्वच्छता पंधरवडा त्या बरोबर ग्रामसभेत मागील सभेचा सभावृत्ता वाचुन मान्यता देण्यात आली मुख्यमंत्री पंचायतराज अभियानाचा शुभारंभ करण्यात येऊन स्पर्धात भाग घेण्याचे व ग्रामस्तरीय समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली तसेच बालविवाह मुक्त अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली व दारू बंद चे निवेदन देण्यात आले

## हिंदी भाषा भारतीय एकात्मतेचे प्रतीक :– डॉ.न.पु.काळे

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** भारतीय भाषांमध्ये हिंदी ही एक राजभाषा म्हणून संविधानामध्ये नोंदवली गेली आहे. जगाच्या पाठीवर तिसऱ्या क्रमांकावर बोलल्या जाणाऱ्या हिंदी भाषेचा गौरव दिन म्हणून १४ सप्टेंबर रोजी आपल्याकडे हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो. देश विदेशात आता हिंदी भाषिक मोठ्या प्रमाणात आढळत आहेत. नामवंत हिंदी साहित्यिकांनी मोठ्या प्रमाणावर हिंदी मध्ये लेखन केले आहे. हिंदी भाषा ही भारतीय एकात्मतेचे प्रतीक आहे." असे प्रतिपादन व्ही. पी.महाविद्यालय, पाटोदा येथील हिंदी विभाग प्रमुख डॉ.न.पु. काळे यांनी केले. जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ, गेवराई संचलित कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा येथे हिंदी दिनाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.काळे बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सोमनाथ घाडगे होते. या प्रसंगी अध्यक्षीय स्थानावरून बोलताना ते म्हणाले, की "आपण सगळ्याच भाषेचा सन्मान केला पाहिजे. आपली भाषा, संस्कृती, रीती–रिवाज याचा प्रत्येकाला गर्व असायला हवा आम्हाला मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा आली पाहीजे त्यातून विद्यार्थ्यांचा भाषिक विकास होण्यास खूप मोठी मदत होते, समाजात सामाजिक अभिसरणाचे काम भाषा करत असते. भाषे मुळे समाज एक संघ राहतो." हिंदी दिनाच्या निमित्ताने विचारपीठावर हिंदी विभाग प्रमुख डॉ.वंदन जाधव, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ.सुनील जाधव, अंतर्गत गूणवंता हमीं कक्षा चे इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.विनोद किर्दक यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. किर्दक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की भाषेला सौंदर्य असते कोणत्या ही भाषे च्या प्रति कठोरता नसावी चांगला माणुस बनण्यासाठी आपला संवाद चांगला राहणे आवश्यक आहे, संभाषण जीवनाचा अविभाज्य घटक आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.शेख खैसर यांनी केले. या वेळी कु.औटे पुजा, कु.भक्ति कोल्हे यानी बनवलेल्या युवा स्पंदन भितीपत्रकाचे प्रमुख पाहुण्याच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.वारभुवन आणि धरती मस्के यांनी केले तर आभार हिंदी विभाग प्रमुख डॉ.वंदन जाधव यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील डॉ.सुनील जाधव, डॉ.काकडे शिवाजी, डॉ.किवणे, डॉ.प्रधान रामकृष्ण, डॉ.लोखंडे बी.बी., प्रा.पापाजी चव्हाण यांच्या सह शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# युवक युवतींनी देशाच्या विकासात आपले योगदान द्यावे– नामदार ॲड. आशिष शेलार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

तरुणांची सर्वात जास्त संख्या असलेला जगातील सर्वात मोठा आपला भारत देश आहे. त्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युवाशक्तीवर लक्ष केंद्रित केले आहे. या युवाशक्तीच्या जोरावर आपला देश २०४७ साली विकसित देश होणार आहे, त्यामुळे देशातील युवक युवतींनी देशाच्या विकासात आपले योगदान द्यावे, असे आवाहन राज्याचे माहिती व तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी युवकांशी संवाद साधताना केले. यावेळी नामदार आशिष शेलार यांनी युवकांशी सहज, सरळ आणि सोप्या शैलीत संवाद साधला. युवाशक्ती काय करू शकते याचे उदाहरणासह त्यांनी युवाशक्तीचे महत्व अधोरेखित केले. परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान आणि लोकशाही जगातीत सर्वोत्कृष्ट असल्याचे त्यांनी नमूद करतानाच ती देशाची ताकद असल्याचे सांगितले.

देशाचे कणखर नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर पर्यंत सेवा पंधरवडा आयोजित करण्यात आला असून या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रमांचे मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत युवकांच्या पुढील वाटचालीकरिता 'विकसित भारत विकसित महाराष्ट्र' या शिर्षकाखाली पनवेल शहरातील विरुपाक्ष मंगल कार्यालयात उत्तर रायगड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने 'युवा संवाद मेळावा' हजारो युवकांच्या उपस्थितीत आणि मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्याचे प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे माहिती व तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी युवकांशी थेट संवाद साधला.



यावेळी व्यासपिठावर प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेल मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण मतदार संघाचे आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, आदी उपस्थित होते.

नामदार आशिष शेलार यांनी युवकांशी पुढे संवाद देताना म्हंटले कि, आपला देश विविध भाषा, संस्कृती, निसर्ग आणि विविध परंपरेने नटलेला एकसंघ देश आहे. आपल्या देशाशेजारील देशांची काय बिकट परिस्थिती झाली आहे ती आपण सर्वजण जाणताच आहात. श्रीलंकेची लोकशाही गेली, पाकिस्तान, बांगलादेश आणि आता नेपाळची परिस्थिती कशी वाईट झाली हे सर्वांनी बघितले आहे, पण आपल्या देशात घरातूनच संस्कार मिळत आहेत त्यामुळे आपला भारत जगातील सर्वात समृद्ध लोकशाही असलेला देश आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपला देश शंभर वर्षांचा होईल तेव्हा म्हणजेच सन २०४७ ला आपला देश विकसित देश म्हणून गणला जाणार आहे. जागतिक दर्जाचे विविध प्रकल्प या परिसरात येत असल्याने देशाच्या विकासाचे केंद्र पनवेल रायगड होणार आहे. त्यामुळे येथील तरुणांना शिक्षण, रोजगार, व्यवसाय आणि करिअरच्या विविध क्षेत्रातील संधी मिळणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात विकासाचे पर्व आणले. त्या माध्यमातून देशाचे संरक्षण, रोजगार, शिक्षण, व्यवसाय मजबूत करण्याचे काम झाले. त्या अनुषंगाने आत्मनिर्भर भारत, स्वदेशी आणि स्वाभिमानी भारत निर्माण करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. आपल्या शास्त्रज्ञांमध्ये ताकद होती मात्र व्यवस्था नव्हती पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बळ दिले आणि क्रांती घडली. मिशन चांद्रयान यशस्वी झाले तसेच एकाचवेळी १०३ सॅटेलाईट अवकाशात झेपवण्याची किमया एकमेव आपल्या देशाने केली. पंतप्रधान झाल्यापासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या विकासासाठी विविध योजना अंमलात आणल्या. काँग्रेसच्या काळात होणारा भ्रष्टाचार सर्वांनीच पाहिला आहे. त्यामुळे त्यावर उपाय म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योजनेतील दलाल दूर करण्यासाठी लाभार्थीच्या थेट बँकेच्या खात्यात जमा करण्याचे महत्वपूर्ण पाऊल उचलले. त्यामुळे मोदी सरकारमुळे लाभार्थीला त्याच्या हक्काचे लाभ मिळायला लागले. अशा अनेक योजनांच्या माध्यमातून तळागाळीत माणसाचा विचार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे, असेही त्यांनी विकासकामांच्या अनेक उदाहरणासह देशाच्या जडणघडणीचा विस्तार संवादातून युवकांसमोर मांडला. त्याचबरोबर त्यांनी सोशल मीडिया संदर्भात तरुणांना सतर्कतेचा सल्ला दिला. तसेच देशाचे सजग आणि सतर्क नागरिक बना, जगातील विकसित देशांच्या रांगेत अभिमानाने उभा राहील. त्या वाटचालीत युवकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणूनच प्रत्येक युवक-युवतीने स्वतःचा विकास साधत देशाच्या प्रगतीत हातभार लावावा, असेही नामदार ॲड. आशिष शेलार यांनी संवाद मेळाव्यात म्हंटले. या मेळाव्याचे प्रास्ताविक आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देश आणि राज्याच्या विकासासाठी घेतलेल्या निर्णयाचा आणि कार्याचा गौरव व उहापोह केला. त्याचबरोबरीने मंत्री आशिष शेलार यांनी पीओपी मूर्तिकारांसाठी घेतलेल्या सकारात्मक निर्णयाबद्दल तसेच सण आणि उत्सवांना समाजाला जोडण्याचा कार्याबद्दल त्यांचे आभार मानले.

## पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते. श्रीक्षेत्र बोरगडी येथील सार्वजनिक बजरंग गणेश मंडळाचा सन्मान...

### बोरगडी च्या मंडळाने पटकावला हिमायतनगर तालुक्यात प्रथम क्रमांक

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनीधी /माधव काईतवाड बोरगडीकर**

**नांदेडः-** जिल्हयातील व शहरातील सर्व गणेश मंडळाचे पदाधिकारी यांना सामाजिक बांधिलकी जपुन श्री गणेश उत्सव-2025 मिरवणुकीत डी.जे./ डॉल्बी/ कर्कश आवाजाचे वैजोचा वापर न करता पर्यावरणपुरक ध्वनीप्रदूषण मुक्त मिरवणुक काढणे बाबत मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी आवाहन केले होते. सण उत्सव आनंदाने साजरा करतांना डिजे वाजवल्याने त्याचे दुष्परिणाम सर्वांनाच सहन करावे लागतात. या आवाजामुळे हृदयावर वाईट परिणाम होतात. हे लक्षात घेवुन जिल्हयातील बहुतांश गणेश मंडळानी स्वतः पुढे येऊन डिजे मुक्त गणेशोत्सव साजरा करणार असल्याचे हमीपत्र दिले होते. नांदेड जिल्ह्यात उत्सव काळात शांतता राखुन उत्तम नियोजन राखले जाते. जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाच्या नियोजनात नागरीकांचा सहभाग असल्याने चांगले


नांदेड जिल्हा पोलीस
डी.जे.मुक्त गणेश मंडळ
प्रमाणपत्र
प्रमाणित करण्यात येते की,
मंडळ श्री सार्वजनिक बजरंग गणेश मंडळ, बोरगडी हिमायतनगर
आपण व आपल्या गणेश मंडळाचे पदाधिकारी यांनी सामाजिक बांधिलकी जपून व पोलीस प्रशासनाच्या आवाहनास मान देऊन श्री गणेश उत्सव २०२५ मिरवणूकीत डी.जे. /डॉल्बी/ कर्कश बँजोचा वापर न करता पर्यावरणपूरक ध्वनीप्रदूषण मुक्त मिरवणूक काढत असल्याबाबत आपल्या मंडळाने उस्फूर्तपणे निर्णय घेतला आहे. याबद्दल मी आपल्या गणेश मंडळाचे नांदेड पोलीस दलातर्फे अभिनंदन व कौतुक करतो.
अविनाश कुमार (भा.पो.से)
पोलीस अधीक्षक, नांदेड

नियोजन करता येते. उत्सव सण काळात डिजेचा वापर न करता पर्यावरणपूरक उत्सव साजरे करून चांगला आदर्श निर्माण करु शकतो. उत्सव काळात गणेश मंडळांनी दिलेल्या सुचनेचे योग्य पालन करावे. विसर्जन काळात रस्ता मार्गात बदल करु नये, वेळेचे बंधन पाळावे, सर्व धर्माचा आदर करुन सण, उत्सव शांततापूर्वक साजरे करावे, असे आवाहन मा. श्री. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी केले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून नांदेड जिल्यातील 250 पेक्षा जास्त गणेश मंडळांनी उस्फुर्तपणे प्रतिसाद देऊन श्री गणेश विसर्जन मिरवणुक पर्यावरणपुरक ध्वनीप्रदुषणमुक्त काढून समाजात एक चांगला संदेश प्रसारित केला. सदर गणेश मंडळाचे पदाधिकारी यांचा आज दिनांक 20/09/2025 रोजी,पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड येथे मा.श्री अविनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांचे हस्ते सन्मानपत्र देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अनुषंगाने मा.श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी आगामी काळात होणारा नवरात्र उत्सव डी.जे. डॉल्बी/ कर्कश आवाजाचे बैंजोचा वापर न करता पर्यावरणपुरक ध्वनीप्रदूषण मुक्त शांततापूर्वक साजरा करणे बाबत नवरात्र मंडळांना मार्गदर्शन करुन सुचना देण्यात आल्या आहेत. सदर कार्यक्रमा दरम्यान मा.श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी नांदेड जिल्हयातील श्री गणेशोत्सव डी.जे./डॉल्बी कर्कश आवाजाचे वैजोचा वापर न करता पर्यावरणपुरक ध्वनीप्रदूषण मुक्त मिरवणुक काढणे बाबत आवाहन केले होते. सदर आवाहनास सकारात्मक प्रतिसाद देवून नांदेड जिल्हयातील जवळपास सर्व श्री गणेश मंडळानी डी.जे. डॉल्बी मुक्त विसर्जन मिरवणुका काढल्या याबद्दल नांदेड जिल्हयातील पोलीस पाटील संघटना पदाधिकारी यांनी मा.श्री अविनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांचा सत्कार केला. सदर कार्यक्रमास मा.श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड, मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक, भोकर, श्री डि.एस. हाके, उपविभागीय पोलीस अधिकारी, भोकर, श्री दशरथ पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी धर्माबाद, नांदेड जिल्हयातील सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी व नांदेड जिल्हयातील विविध गणेश मंडळाचे पदाधिकारी, जिल्हयातील सरपंच, पोलीस पाटील हजर होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सपोनि रियाज शेख, यांनी उत्तमरित्या केले.

## विद्यार्थ्यांनी घेतला निसर्ग सहलीचा आनंद

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** तालुक्यातील पालोद येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी खेळणा मध्यम ( माणिकसागर) प्रकल्पास भेट देऊन निसर्ग सहलीचा आनंद घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली या सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी पाचवी ते बारावीपर्यंत च्या विद्यार्थ्यांनी निसर्ग सहली सोबत पाण्यामध्ये मनसोक्त भिजण्याचा, खेळण्याचा आणि आपल्या वर्गमित्र मैत्रिणी सोबत वनभोजनाचा आनंद घेतला.

दप्तराविना शाळा आनंददायी शनिवार उपक्रमा अंतर्गत या निसर्ग सहलीचे आयोजन करण्यात आले होते. खेळणा प्रकल्पाचा इतिहास, परिसरातील वेगवेगळ्या वनस्पतींचा आणि लोकसंस्कृतीचा अभ्यासपूर्ण माहिती यावेळी प्रा. एकनाथ जंजाळ यांनी विद्यार्थ्यांना दिली.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी निसर्गरम्य वातावरणाचा पुरेपूर आनंद घेऊन नृत्य, निसर्ग गीत, विविध नाटकेही सादर केली. या सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रदीप कानडजे, दुर्गा जाधव यांनी गीतगायन सादर करून आपल्या आवाजाने विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.

सहलीच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील शिक्षक दिलीप जाधव, सुनील तांबे, कृष्णा भांडारे, राजेश ठोंबरे, सुनील सागरे, कृष्णा पाटील, योगेश निंभोरे, राजाभाऊ भोसले, प्रफुल्ल





कळम, भास्कर केरले, गजानन सपकाळ, गणेश दिवटे, डॉ रमेश काळे, संजय जाधव, महादेवी ठवरे, जयश्री चापे, संतुकराव मोरे, अक्षय निकम यांनी परिश्रम घेतले.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान व सेवा पंधरवाडा उपक्रमांचा शुभारंभ

**दैनिकः युवक आधार/ पिंपळगाव बसवंत प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड**

देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार दिलीप काका बनकर यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रमाचे आयोजन.*

जिल्हा परिषद नाशिक व पंचायत समिती निफाड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ साकोरेमिक या ग्रामपंचायत पासून करण्यात आला.

भारत देशाचे पंतप्रधान आदरणीय श्री नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहेत त्याचाच एक भाग म्हणून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान व सेवा पंधरवाडा या उपक्रमांचा शुभारंभ करण्यात आला.

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थेचे मोठे योगदान असून त्रिस्तरीय पंचायत राज संस्थेमार्फत ग्रामीण भागात चा सर्वांगीण विकास करणे हे मुख्य ध्येय आहे राज्यातील विकासाच्या बहुतांश योजना पंचायत राज संस्था मार्फत राबवल्या जातात त्या अनुषंगाने ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून काम करणाऱ्या ग्रामपंचायत पंचायत समिती व जिल्हा परिषदांना कामगिरी नुसार प्रोत्साहित करून त्यांची कार्यक्षमता वाढवणे आवश्यक आहे . ग्रामविकास विभाग व शासनाच्या इतर विभागांच्या विविध योजना जिल्हा परिषद मार्फत राबवल्या जातात सदर योजनांची प्रभावी वेळ जलद गतीने अंमलबजावणी करून त्याचा लाभ ग्रामीण



भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यात यातून ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावणे ग्रामपंचायत मध्ये लोकसहभागाची चळवळ निर्माण करणे ग्रामीण नागरिकांना सुलभ रीतीने सेवा देणे महाराष्ट्रातील थोर संत परंपरेचा सहभाग घेणे आरोग्य शिक्षण उपजीविका सामाजिक न्याय या मुख्य क्षेत्रामध्ये ग्रामपंचायतचा सहभाग वाढून पंचायत राज संस्था गतिमान करणे या संकल्पनेतून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियंत राबवण्याचा शासनाचा उद्देश आहे.

ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून प्रामुख्याने काम करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहित करून त्याची कार्यक्षमता वाढवण्याकरता उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत पंचायत समिती व जिल्हा परिषदेसाठी सन 2025 ते 26 या आर्थिक वर्षापासून तालुका जिल्हा महसूल विभाग व राज्य अशा चार स्तरावर प्रोत्साहन देण्याकरिता मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान हे पुरस्कार अभियान राबवण्यात येत आहे अभियान कालावधी दिनांक 17 सप्टेंबर 2025 ते 31 डिसेंबर 2025 असा आहे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचे सात मुख्य घटक व 100 गुणांचे हे अभियान आहे.

तालुका जिल्हा व राज्यस्तरीय प्रथम, द्वितीय,तृतीय व दोन विशेष पुरस्कारासाठी ग्रामपंचायतची निवड करण्याकरता मूल्यमापनासाठी गट विकास अधिकारी पंचायत समिती निफाड यांचे अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती गठित करण्यात आलेली आहे. निवड झालेल्या ग्रामपंचायतींना लाखो रुपयांची पुरस्काराची रक्कम मिळणार आहे.

तसेच छत्रपती शिवाजी महाराज महाराज स्व अभियानांतर्गत राष्ट्रनेता पंतप्रधान मा.श्री नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन दिनांक 17 सप्टेंबर 20 25 राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती 2 ऑक्टोबर वीस पंचवीस या कालावधीमध्ये सेवा पंधर वाडा साजरा करणे हा देखील उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

महसूल विभाग हा जनतेच्या दैनंदिन समस्या आणि जिव्हाळ्याच्या विषयांशी अत्यंत जवळून संबंध असलेला विभाग आहे सामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी महसूल प्रशासन आणि लोक भिमुख कार्यक्षम गतिमान व पारदर्शक होण्याची आवश्यकता आहे.

सेवा पंधरवड्यात राबवायचे उपक्रम हे यापूर्वीपासून राबविण्यात येत असून पंधरवड्या दरम्यान त्यानंतर निरंतरपणे राबवले जाणारे उपक्रम आहेत मात्र या कालावधीत सदर उपक्रम मोहीम स्वरूपात युद्धपातळीवर राबवायचे आहेत.

सदर अभियान तीन टप्प्यांमध्ये पुढील प्रमाणे राबवायचा आहे.

अ) पहिला टप्पा -आनंद रस्ते विषयक मोहीम.

आ) दुसरा टप्पा- सर्वांसाठी घरे या उपक्रमासाठी पूरक उपक्रम.

इ)तिसरा टप्पा- जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक परिस्थितीचा विचार करून नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणे.

विधान परिषदेचे माजी आमदार श्री नानासाहेब बोरस्ते यांच्या अध्यक्षतेखाली सदर शुभारंभ करण्यात आला असून याप्रसंगी श्री माणिकराव बोरस्ते, श्री भागवत बाबा बोरस्ते,सौ शोभाताई बोरस्ते, श्री माणिक भाऊ बोरस्ते, अशोकराव माळोदे,श्री अनिल बोरस्ते,श्री दीपक काका बोरस्ते,श्रीराम कृष्ण महाले,श्री दिलीपराव बोरस्ते, श्री निखिल हिरे यांच्यासह साकोरे गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते तर तहसीलदार श्री विशाल नायकवाडें गट विकास अधिकारी नम्रता जगताप, बालविकास प्रकल्प अधिकारी वनिता पाटील, मंडळ अधिकारी सतीश बोडके तसेच निफाड पंचायत समितीचे विविध अधिकारी व कर्मचारी तसेच महसूल विभागाचे विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते तर सूत्रसंचालन श्री नाना तिडके यांनी केले.

# अजिंठा येथे एड्स संवेदीकरण कार्यशाळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** तालुक्यातील अजिंठा येथील महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे एड्स संवेदीकरण कार्यशाळा संपन्न झाली. जिल्हा रुग्णालय छत्रपती संभाजीनगर एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग दिशा इंटेन्सिफाइड आयसी कॅम्पेन अंतर्गत एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र उपजिल्हा रुग्णालय सिल्लोड विभागातर्फे महाविद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक ग्रामीण रुग्णालयाचे समुपदेशक मंगेश कांबळे यांनी एड्स कसा होतो, त्याची लक्षणे प्रतिबंधक उपाय आणि समाजातील गैरसमज यावर



विद्यार्थ्यांची संवाद साधला तसेच किशोर अवस्थेतील शारीरिक मानसिक आणि भावनिक बदल यावर मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये एड्स विषयी जागरूकता निर्माण झाली. संवादात्मक पद्धतीने विद्यार्थ्यांचे प्रश्न समजून घेत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मनोज देशमुख यांनी अशा कार्यशाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे उपयुक्त असून या कार्यशाळेमुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचेल असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक शांतीलाल झलवार यांनी केले तर कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील शिक्षक काकासाहेब पाटील, लोकेश पालोदकर, संजय पायगन , भाऊसाहेब जंगले, प्राध्यापक कान्होबा घोंगडे , प्राध्यापक अनंत बुलबुले , डॉ. गोपीनाथ डापके , प्राध्यापक किरण मोरे , देवेंद्र तायडे, सचिन पालोदकर, विलास जाधव , सुरेश वडोदे , विजू पवार, दिनेश भैय्या यांची उपस्थिती होती.

# थेपडे म्हसावद विद्यालयाचे तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत यश

**दैनिक युवक आधार**
**समाधान पाटील जळगाव जिल्हा प्रतिनिधी**

स्वा. सै. प. ध. थेपडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय म्हसावद जि. जळगाव येथील तालुकास्तरीय 17वर्षीय आतील बुद्धिबळ स्पर्धेत इ.10 वी अ ची विद्यार्थीनी *कु. गौरी प्रदीप चौधरी* हिने तालुकास्तरावर विजय मिळवून तिची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. संस्थेचे चेअरमन डॉ. केदारजी थेपडे साहेब, शाळेचे मुख्याध्यापक श्री. पी. डी.चौधरी सर, उपमुख्याध्यापक श्री. जी डी बच्छाव सर, पर्यवेक्षक के पी पाटील सर, शिक्षक प्रतिनिधी श्री सचिन चव्हाण सर तसेच सर्व शिक्षक बंधू-भगिनी यशस्वी विद्यार्थिनीचे व क्रीडा शिक्षक श्री राहुल गिरासे सर यांचे हार्दिक अभिनंदन केलेले आहे आणि कु. गौरी प्रदीप चौधरी हिला जिल्हास्तरीय





बुद्धिबळ स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. सोबत मार्गदर्शक क्रीडाशिक्षक श्री राहुलसिंग गिरासे सर होते.

## आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी धडपडणाऱ्या आश्रम शाळेतील शिक्षकाचा 'आदर्श शिक्षक ' या पुरस्काराने गौरव.

**दैनिक युवक आधार**
**उमाकांत पानसरे उरण प्रतिनिधी**



ज्ञानरूपी दीप प्रज्वलित करून आदिवासी विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रकाश आणि संस्कार यांची शिदोरी देत आदिवासी समाजाशी घट्ट बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्व म्हणजेच श्री. महादेव चंद्रकांत डोईफोडे सर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी श्री.आत्माराम धाबे सर , सहाय्यक शिक्षण प्रकल्प अधिकारी श्री. मारुती गायकवाड सर , लायन श्री.संजय सूर्यवंशी सर, लायन श्री. यशवंत चित्रे सर तसेच जिल्हा शिक्षण समितीचे सर्व सन्माननीय सदस्य आणि सर्व मुख्याध्यापक यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. 18 सप्टेंबर 2025 सकाळी 11 वाजता आश्रम शाळा ' पडसरे ' ता.पेण जि. रायगड पार पडलेल्या समारंभात चिरनेर येथील आश्रम शाळेतील शिक्षक श्री.महादेव चंद्रकांत डोईफोडे यांचा आदर्श शिक्षक म्हणून लायन्स इंटरनॅशनल आणि आदिवासी विकास प्रकल्प पेण यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श शिक्षक पुरस्कार प्रमाणपत्र आणि पदक देऊन सन्मान करण्यात आला. श्री महादेव डोईफोडे यांना याआधीही काही पुरस्कार मिळालेत जसे की महाराष्ट्र शासन आदिवासी विकास आयुक्त नाशिक यांचे कडून आदिवासी समाजासाठी धडपडणाऱ्या शिक्षकांसाठी पिचकुड या पुस्तकात शिक्षणाच्या ज्ञानगंगा यशोगाथा प्रसिद्ध झाली आहे , ज्ञान पंढरीचा वारकरी या दैनिक पुढारीच्या आदर्श शिक्षक पुरस्कार , महात्मा गांधी पीपल्स अवॉर्ड कौन्सिल महाराष्ट्र तर्फे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श शिक्षक पुरस्कार अशा अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा आदिवासी समाजा सोबतच चिरनेर / उरण परिसरातील अनेक सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.

## निवृत्त लष्करी जवानाचा मुलगा हवाई दलात फ्लाइंग ऑफिसर झाला

**दैनिक युवक आधार**
**जोत्स्ना करवाडे नागपूरः**



साईनगर, झिंगाबाई टाकळी येथील रहिवासी हर्षद केशव भुरे यांना हवाई दलाच्या एरोनॉटिकल इंजिनिअरिंग शाखेत कमिशन मिळाले आहे. त्यांचे पालक आणि मित्र ६ सप्टेंबर २०२५ रोजी बेंगळुरू येथील एअर फोर्स टेक्निकल कॉलेज मधून त्यांच्या पासिंग आउट परेडला उपस्थित होते. फ्लाइंग ऑफिसर हर्षद भुरे यांचे वडील, लष्कराच्या पॅराशूट रेजिमेंट स्पेशल फोर्सेस मध्ये निवृत्त शिपाई, सध्या बँक ऑफ इंडिया सीताबर्डी शाखेत कॅशियर आहेत. त्यांनी त्यांच्या दोन्ही मुलांना चांगले शिक्षण, संगोपन आणि शारीरिक तंदुरुस्ती देण्यावर लक्ष केंद्रित केले. हर्षदने नागपूरच्या केडीके अभियांत्रिकी महाविद्यालयातून संगणक शास्त्रात पदवी प्राप्त केली आणि जून २०२४ मध्ये अलाहाबाद बोर्डातून एसएसबी उत्तीर्ण झाल्यानंतर तो भारतीय हवाई दलात सामील झाला. त्याने हैदराबादमध्ये सहा महिने कठोर प्रशिक्षण घेतले, त्यानंतर बेंगळुरू येथील एफटीसी (इंडियन एअर फोर्स टेक्निकल कॉलेज) येथे एक वर्षाचे प्रशिक्षण घेतले आणि त्याची पासिंग आउट परेड ६ सप्टेंबर २०२५ रोजी झाली. फ्लाइंग ऑफिसर हर्षद भुरेच्या पालकांनी आणि कुटुंबियांनी त्याच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

# सण उत्सव पर्यावरणपूरक साजरे करा निफाड नगरपंचायतीचा उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

एक पाऊल स्वच्छतेकडे एक पाऊल आरोग्याकडे अंतर्गत स्वच्छता सेवा पंधरवाडा १७ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५ पर्यंत एक दिवस एक तास एक साथ स्वच्छता मोहीम घोषित केले आहे सदर अभियान हे गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय भारत सरकार यांचे कडील पत्रांमुळे दिनांक १७ सप्टेंबर २०२५ ते दिनांक २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान स्वच्छता सेवा ( एस.एच. एस.) हे अभियान राबवण्याचे निर्देश शासनामार्फत देण्यात आलेले आहे. या अभियानात स्वच्छता मोहीम राबवणे व नागरिकांचे समर्थन व सहभाग स्वच्छता कामगारांच्या योगदानाची ओळख स्वच्छता करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आरोग्य आणि कल्याण यांना प्राधान्य देणे आणि पर्यावरण पूरक पद्धतीने सण उत्सव साजरा करणे. अभियानात नगरपंचायतने शहरात विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम प्लास्टिक प्रदूषण कमी करणे करता जनजागृती मोहीम वर तसेच घर स्वच्छता बाबत जनजागृती मोहीम सफाई कर्मचारी यांचे आरोग्य शिबिर वृक्ष लागवड व संगोपन संवर्धन करणे याबाबत जनजागृती करण्यासाठी शाळा महाविद्यालयामार्फत विविध स्पर्धांचे आयोजन आयोजन जसे की चित्रकला स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा निबंध स्पर्धा पथनाट्य प्रभात फेरी काढणे सायकल रॅली काढणे.अशा विविध प्रकारच्या आयोजनांचे केले आहे.

दिनांक १८ सप्टेंबर २०२५ रोजी निफाड नगरपंचायतीमार्फत शांतीनगर चौफुली ते छत्रपती संभाजी नगर रोड या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली यावेळी अधिकारी कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच निफाड नगरपंचायतचे मुख्याधिकारी श्री धीरज भामरे यांनी नागरिकांना आपल्या सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवून आपलं निफाड शहर स्वच्छ सुंदर ठेवण्यात नगरपंचायतीला सहकार्य करावे असे आवाहन यावेळी करण्यात आले.





## "आम्ही कोकणकर" संघटना राज्यस्तरीय आदर्श कोकणी युवा संघटना पुरस्कार 025 ने सन्मानित



**दैनिक युवक आधार**
**मुंबईः-(प्रमोद तरळ)**

दिशा महाराष्ट्राची आयोजित पहिले कवी संमेलन आणि राज्यस्तरीय सन्मान सोहळा या कार्यक्रमात "आम्ही कोकणकर " संघटनेला 'राज्यस्तरीय आदर्श कोकणी युवा संघटना पुरस्कार २०२५' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.या सोहळ्याच्या वेळी "आम्ही कोकणकर" संघटनेच्या १२ वर्षाच्या कार्याचे कौतुक करण्यात आले.

"आम्ही कोकणकर" ही संघटना म्हणजे कोकणच्या मातीशी जोडलेली, लोकांच्या मनाशी नातं जपणारी आणि पुढच्या पिढीला कोकणाची खरी ओळख करून देणारी एक चळवळ आहे.

गेल्या १२ वर्षांच्या प्रवासात या संघटनेने केवळ एक चळवळ म्हणून नव्हे, तर एक संवेदनशील, सक्रिय आणि संस्कृतीप्रेमी सामाजिक संघटना म्हणून आपलं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. जसे की सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातअनेक उपक्रम राबवले

कोकणातील पारंपरिक कला आणि सण - उत्सवांचे जतन, सामाजिक एकोप्याला चालना देणारे उपक्रम,

विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे शैक्षणिक कार्यक्रम,

आणि ग्रामीण भागातील प्रतिभांना व्यासपीठ देण्याचा सातत्याने केलेला प्रयत्न, गेली तीन वर्षे "कोकण सन्मान सोहळा" चे मुंबई रंगमंचावर आयोजन केलं पुढे करत आहे. पूर्वजांच्या पुण्याईने मिळालेला कोकण संस्कृतीचा वारसा अनंत काळ टिकवून ठेवण्यासाठी ही संघटना सातत्याने काम करत आहे.या संघटनेला त्याची कार्याची दखल घेऊन अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

हा सन्मान "आम्ही कोकणकर"च्या प्रत्येक शिलेदाराचा, कलाकारांचा, तसेच हितचिंतकांचा या संघटनेशी ज्याचं प्रेमाचं नातं अगदी घट्ट आहे ते रसिक राजा यांचा आहे..ही ऊर्जा अशीच आपण सगळ्यांनी अशीच कायम ठेवली पाहिजे ही आपली सर्वांची जबाबदारी असल्याचे यावेळी सांगितले

हा पुरस्कार स्वीकारताना अनेक "आम्ही कोकणकर"चे शिलेदार सोहळ्याला उपस्थित होते.

## सिग्नल तोडून ट्राफिक पोलिसास ठोस मारून जखमी करणाऱ्या युवकास सजा

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**निफाड :-** नाशिक शहरातील सरकारवाडा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अपघातप्रकरणी आज मा.अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, कक्ष ६ वे, नाशिक यांनी आरोपी समाधान चंद्रकांत साळवे (रा. दुडगाव, ता. नाशिक) यास दोषी ठरवत शिक्षा सुनावली. दि.२५ ऑक्टोबर २०१२ रोजी शहर वाहतूक शाखेतील पोलिस अंमलदार आनंदसिंग राजपुत हे जलतरण तलाव सिग्नल, गोल्फक्लब येथे कर्तव्यावर असताना आरोपीने भरधाव वेगात दुचाकी चालवत ग्रीन सिग्नल नसताना जाण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी थांबविण्यास गेलेल्या पोलिस अंमलदारांना ठोकर मारून जखमी केले. तपासातून आरोपीकडे वाहनचालक परवाना व कागदपत्रेही नसल्याचे निष्पन्न झाले. या गुन्ह्यातील फिर्यादी व पंच साक्षीदार तसेच परिस्थितीजन्य पुरावे यांच्या आधारे न्यायालयाने आरोपीस भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४, १८१, ११९/१७७ व १५८/१७७ अंतर्गत दोषी ठरवून विविध कलमान्वये दंड व अल्पकालीन शिक्षा सुनावली तसेच फिर्यादी पोलिस अंमलदारास दंडातून ३,५०० रुपये नुकसानभरपाई देण्याचा आदेश दिला. सरकारी पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.एस. चिताळकर यांनी कामकाज पाहिले. तर कोर्ट पैरवी अंमलदार एस.एस. भांड, पो.कॉ.जी.ओ.भोसले यांनी सातत्याने पाठपुरावा केला. तपासी अधिकारी पो.हवा. जे.जे.शेख यांनी गुन्हा शाबीत होण्यासाठी केलेल्या मेहनतीचे विशेष कौतुक करण्यात आले. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मा.पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, मा.पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, श्रीमती मोनिका राऊत, नितीन जाधव, संदीप मिटके तसेच सरकारवाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश आव्हाड यांनी अभिनंदन केले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# राज्य महिला आयोग विवाहपूर्व समुपदेशन केंद्रासाठी अग्रक्रमाने काम करणार

## महिला आयोग आपल्या दारी' उपक्रमांद्वारे अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न

### राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर

### जनसुनावणीत महिलांच्या 68 तक्रारींवर कार्यवाही

**दैनिक युवक आधार**
**राकेश यादव प्रतिनिधी वाडी नागपूर**

नागपूर, दि.18 : लग्नसंस्था ही आपल्या भारतीय समाजाचा पाया आहे. ती टिकवण्यासाठी घटस्फोटांच्या वाढत्या प्रमाणावर गंभीरपणे काम करणे आवश्यक आहे. त्यामुळे लग्नानंतर वाद झाल्यास होणाऱ्या समुपदेशनाबरोबरच लग्नाच्याआधी, तरुण वर्गाचे विवाहपूर्व समुपदेशन यावर भर देणे आवश्यक आहे. येत्या काळात राज्य महिला आयोग विवाहपूर्व समुपदेशन केंद्राबाबत अग्रक्रमाने काम करणार असल्याचे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी आज येथे सांगितले

राज्य महिला आयोगाच्या वतीने 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत महिलांच्या समस्या व तक्रारींचा निपटारा करण्यासाठी सदर येथील जिल्हा नियोजन भवन येथे जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, नागपूर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव अड. प्रवीण उन्हाळे, महिला व बालविकास विभागीय उपायुक्त दत्तात्रय मुंडे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुनील मेसरे यांच्यासह संबंधित वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, समुपदेशक, तक्रारदार, पॅनलमध्ये समाविष्ट विधीतज्ज्ञ, पोलीस अधिकारी, सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्य महिला आयोगाचे मुख्यालय मुंबईत आहे. राज्यातील कानाकोपऱ्यातल्या महिलांना आर्थिक, सामाजिक तसेच विविध कारणांमुळे मुंबईत येणे शक्य होत नाही. तेव्हा त्यांच्या तक्रारी ऐकण्यासाठी, मदत करण्यासाठी आयोगच जिल्हास्तरावर जात असतो. जिल्हास्तरावरच महिलांच्या तक्रारींचे निराकरण करण्याकरीता प्रत्येक जिल्ह्यात महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमांतर्गत जनसुनावणीचे आयोजन करण्यात येत आहे. जनसुनावणीमुळे वेळ वाचून खर्चाची



बचत होण्यासोबतच महिलांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराला न्याय मिळेल, असे आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यावेळी म्हणाल्या. महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमांतर्गत गडचिरोलीपासून जनसुनावणीला सुरुवात करण्यात आली. गेल्या चार वर्षात संपूर्ण महाराष्ट्रात अनेकदा सुनावणी घेण्यात आल्या आहेत. केंद्र आणि राज्य शासनाने महिलांच्या सुरक्षेसाठी अनेक चांगले कायदे तयार केले आहेत. महिलांना भक्कमपणे साथ देत समाजातील विकृती विरोधात आयोगाची लढाई आहे. महिलांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराला न्याय देण्याची आयोगाची भूमिका आहे. यात महिलांचाही सहभाग महत्वाचा असल्याचे आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती चाकणकर यावेळी म्हणाल्या.

आज आयोजित करण्यात आलेल्या जनसुनावणीदरम्यान एकूण 68 तक्रारी प्रत्यक्ष उपस्थित राहून नोंदवण्यात आल्या, ज्यामध्ये कौटुंबिक स्वरुपाच्या तक्रारींचे प्रमाण सर्वाधिक होते. महिलांच्या तक्रारी निवारणाकरीता आयोजित जनसुनावणीसाठी चार पॅनल तयार करण्यात आले होते. पहिल्या पॅनलमध्ये आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्यासह जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा पोलिस अधीक्षक ग्रामीण हर्ष पोद्दार, महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, नागपूर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव अड. प्रवीण उन्हाळे, पोलिस उपायुक्त राहुल माकणीकर यांचा समावेश होता. अन्य पॅनलमध्ये विधीज्ञ, पोलिस अधिकारी, सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी महिला व मुलांच्या सहाय्य कक्षाचे समुपदेशक तसेच अन्य अधिकारी, सदस्यांचा समावेश होता. या पॅनलने महिलांच्या समस्या जाणून घेतल्या. ज्या तक्रारींवर आजच कार्यवाही पूर्ण झाली नाही त्यांना योग्य त्या संबंधीत यंत्रणांकडे पाठविण्याची शिफारस करण्यात आली असून त्याबाबत आयोग आढावा घेणार आहेत.

***जनसुनावनीत महिलांच्या 68 तक्रारी***

जनसुनावनीत एकूण 68 तक्रारी दाखल झाल्या. त्यात वैवाहिक व कौटुंबिक स्वरुपाच्या 37 तक्रारींचा समावेश आहे. तसेच सामाजिक स्वरुपाच्या 14, आर्थिक आणि मालमत्ता विषयक 7, कामाच्या ठिकाणी महिलांना होणारा त्रास 8 व इतर स्वरुपाच्या २ तक्रारींचा समावेश आहे. सर्वांची आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर आणि पॅनेलच्या सदस्यांनी आस्थेने विचारपूस केली.

***जनसुनावणीस महिलांचा प्रतिसाद***

आयोगाच्या या जनसुनावणीस जिल्ह्यातील महिलांनी उपस्थिती दर्शवित चांगला प्रतिसाद दिला. बाहेरून आलेल्या प्रत्येक महिलेस सुरुवातीस कक्षाच्या बाहेर लावण्यात आलेल्या नोंदणी टेबलवरून टोकन नंबर देण्यात आले. त्यानंतर देण्यात आलेल्या पॅनलसमोर उपस्थित राहून महिलांनी आपल्या लेखी तक्रारी, समस्या सादर केल्या. प्रत्येक महिलेचे म्हणणे पॅनल सदस्यांनी आत्मियतेने ऐकून घेतले व त्यावर कार्यवाही केली.

***जनसुनावणीसाठी चार पॅनेल***

महिलांच्या तक्रारींचे निराकरण करण्याकरीता आयोजित जनसुनावणीसाठी चार पॅनल तयार करण्यात आले होते. या पॅनलमध्ये विधी तज्ज्ञ, पोलीस अधिकारी, सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी, महिला व मुलांच्या सहाय्य कक्षाचे समुपदेशक तसेच अन्य अधिकारी, सदस्यांचा समावेश होता. या पॅनलने महिलांच्या समस्या जाणून घेतल्या.

**माध्यमांशी साधला संवाद**

जनसुनावणीपुर्वी माध्यम प्रतिनिधींशी त्यांनी संवाद साधला. छळ प्रतिबंध कायदा म्हणजेच पॉश कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी सर्व कार्यालयांमध्ये पॉश ऑडिट अनिवार्य करावे अशी मागणी राज्य महिला आयोगाने शासनाकडे केली होती. शासनाने याबाबत सकारात्मक भूमिका घेऊन २२ ऑगस्ट २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. यानुसार सर्व जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर कामासाठी बाहेर पडणाऱ्या ' वर्किंग वुमन फोर्स' ला सुरक्षित वातावरण देणे ही आपली जबाबदारी असल्याचे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी सांगितले.

# मंठा पंचायत समितीचा सावळा गोंधळ.

## आकणी गावातील बोगस पीएम आवास योजना घोटाळा उघडकीस

### घरकुल निरीक्षका कडून घरकुल धारकाची लूट.

### आम्ही सगळे भाऊ आणि मिळून योजना खाऊ,

दैनिक युवक आधार
उपसंपादकः-राजु शिंदे.

अशाच पद्धतीचे चित्र मंठा तालुक्यात आकणी या गावात दिसत आहे.

यापूर्वीच्या इंदिरा आवास योजनेतील घोटाळा दाबण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले,

आता पंतप्रधान आवास (घरकुल) योजनेतही मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाले आहेत.

गावात सर्वेक्षण करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांनी प्रत्येक कुटुंबाकडून ५०० रुपये घेतले. त्यानंतर पैसे घेतलेल्यांना योजनेत समाविष्ट करण्यासाठी ग्रामसेवक ग्रामसभेचा ठराव करून लाभार्थ्यांची नावे घरकुल योजनेच्या यादीत समाविष्ट केली गेली. त्यानंतर, घरकुल बांधकामासाठी १५ हजार रुपयांचा पहिला हप्ता थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आला. प्रत्यक्षात पाहणी केली असता, यादीत नाव असलेल्या अनेक लाभार्थ्यांची एक मजली पक्के घर असूनही तसेच, ज्या लाभार्थ्यांनी पहिला हप्ता घेऊनही काम सुरू केलेले नाही,

दोन मजली आलिशान घरे आधीच उभी आहेत. असे असूनही, त्यांची नावे यादीत आली आहेत आणि त्यांना पहिला हप्ताही मिळाला आहे. पुढील हप्ते मनरेगा (नरेगा) मार्फत दिले जातात. या प्रकारामुळे, कागदावर बांधलेली अनेक बनावट घरकुले मंठा तालुक्यात आकणी या गावात आहेत. सरकारच्या पीएम आवास योजनेमधील बेघरांना घर देण्यासाठी ही योजना असून




मात्र यामध्ये बऱ्याच पैकी शासनाने पीएम आवास रक्कम रुपये लाभार्थ्यांच्या खाती (अकाउंट) अशाप्रकारे टाकले हे घरकुल निरीक्षक व ग्रामसेवक प्रत्येकी व्यक्तीकडे पाच हजार ते दहा हजार रुपये घेतल्याशिवाय पुढील हप्ता टाकत नाही व फोटो लोड करत नाही. गोरगरिबांना आधीच रक्कम कमी मिळून राहिली व टप्प्यात प्रशासकीय अधिकारी मोठ्या प्रमाणात लूटमार करत आहे

प्रशासनाने घरकुल लाभार्थ्यांसाठी पाच ब्रास पर्यंत वाळू उपलब्ध करून देण्यात आदेश असताना देखील प्रशासनाने योजना का राबवत नाही?

ही केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना जसे की घरकुल योजना ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील घरकुल योजना रमाई आवास योजना DRDAची उद्दिष्टे करण्याच्या व सहान जागेवर घरे बांधून देणे. शहानिशा करावी किती व्यक्तींची घरे ग्रामसेवक ,घरकुल निरीक्षक यांच्याशी तोडपाणी करून घरे न बांधता पैसे उकळण्याचा काम केला आहे दप्तर दिरंगाईमुळे विधवा वयोवृद्ध कष्ट करू शेतकरी प्रवर्ग यांची लूट चालू आहे

या घोटाळ्यात रोजगार सेवक,

ग्रामसेवक, घरकुल निरक्षक तसेच पंचायत समितीमधील अनेक कर्मचारी आण ि अधिकारी सामील असल्यामुळे पंतप्रधान आवास योजनेबरोबरच इतर सर्व घरकुल योजनांमध्ये अनेक हात बरबटले असल्याची चर्चा खुलेआम सुरू आहे. यावर प्रशासन कधी कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# संस्कारांशिवाय नाती तुटतात; कुटुंबात प्रेम-स्नेह हवा — युवराज पाटील

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

**निफाड** उद्याची आदर्श पिढी घडवायची असेल तर आई-वडिलांनी मुलांवर संस्कार करून प्रेमाची , मायेची ऊब द्यायला हवी असे प्रतिपादन लेखक युवराज पाटील यांनीं केले

निफाड येथील शारदीय व्याख्यानमाला समितीच्या वतीने नवरात्र पूर्वसंध्येला चार दिवसीय शारदीय व्याख्यानमालेचे निफाड येथील रविराज मंगल कार्यालय येथे आयोजन करण्यात आले असून या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प ,संस्काराचे विद्यापीठ - कुटुंब या विषयावर गुंफतांना त्यांनी वरील प्रतिपादन केले दरवर्षी नवरात्रामध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या या शारदीय व्याख्यानमालेचे हे 13 वे वर्ष होय

या व्याख्यानमालेचे उदघाटन निफाडचे प्रांत डॉ शशिकांत मंगरूळे यांनी दीपप्रज्वलन करून केले याप्रसंगी व्यासपीठावर,

प्रांत डॉ शशिकांत मंगरूळे , शारदीय व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष रतन पाटील वडघुले,या व्याख्यानमालेच्या पहिले पुष्पाचे प्रायोजक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते वि .दा. व्यवहारे ,वैनतेय विद्यालयाचे पर्यवेक्षक गुलाब टकले व सौ मंदाकिनी टकले आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वि. दा.व्यवहारे यांनी केले आपल्या व्याख्यानात युवराज पाटील पुढे म्हणाले की एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये घरातील कुटुंबप्रमुखाच्या मार्गदर्शनाखाली संस्कार नातीगोती टिकून होती परंतु



विभक्त कुटुंब पद्धती वाढल्याने एकमेकाला समजून घेण्याचं प्रमाण कमी झाले असून घटस्फोटाचे सर्वात जास्त प्रमाणात विभक्त कुटुंब पद्धतीत आढळते विशेष म्हणजे लग्नानंतर एकमेकाला समजून घेण्याची वृत्ती कमी असल्याने लग्नानंतर दोनच वर्षात फारकतीचे प्रमाण वाढले आहे शिक्षणामुळे संस्कार घडण्याऐवजी मनातल्या भिंती उभे राहिल्यात सध्याच्या काळात विभक्त कुटूंबात एकमेकावरील प्रेम ,जिव्हाळा नात्यात कमी झाला आहे

कुटूंबात प्रेमानं, स्नेहान राहील पाहिजे हा कुटुंब व्यवस्थेचा कणा आहे वृद्धाश्रम वाढले हा मोठा विषय होतो पण मी म्हणतो वृद्धाश्रम नसते या वृद्धांना कोणी सांभाळलं असतं पावसाळ्यात बेडूक मरून पडतात तशी रस्त्यावर वृद्ध माणस मरून पडली असती असे ते म्हणाले

पूर्वी गावागावात एकत्र कुटुंबात,कुटुंबप्रमुख,गावचा प्रमुख , म्हणजे तो एक समुपदेशक होता कुटुंबातील, गावातील नात्यातील वाद त्यांच्या शब्दावर मिटवले जायचे आता कुटुंबात समुपदेशक राहिलाच नाही त्यामुळे विभक्त कुटूंबात एकमेकाला समजून घ्यायला कोणी तयार नाही त्यामुळे घरात वाद वाढले चुलीमध्ये निखारा आहे तोपर्यंत निखाऱ्याला किंमत असते निखारा चुलीच्या बाहेर फेकला की त्याचा कोळसा होतो नात्यात तसंच झालंय कुटूंबात नाती टिकवली नाही तर आयुष्याचा कोळसा होतो कुटुंबामध्ये संवेदनशीलता रुजवणे आवश्यक आहे दुसऱ्या माणसाविषयी दुःख , वेदना जपली पाहिजे एकमेकाविषयी जिव्हाळा कमी झालाय कुटुंबामध्ये, समाजामध्ये दुःखाचं कारण हव्यास आहे मिळणाऱ्या पैशात समाधान न मानता अपेक्षा जेव्हा जेव्हा वाढत जातात तेव्हा हव्यास वाढत जातो आणि मिळालेला कुठलाही पैसा आपल्याला सुख देत नाही पैसा पद प्रतिष्ठा या खोट्या प्रतिष्ठेत आपण अडकलो आहोत प्रत्येकाच्या हातात मोबाईल आल्यामुळे कुटुंबातील संवाद कमी झालाय असे ते म्हणाले

सूत्रसंचालन श्रीमती भारती लंबाते यांनी तर आभार प्रदर्शन रतन पाटील वडघुले यांनी केले

# उरण तालुका कुत्रे चावण्यात जिल्ह्यात नंबर वन;

## नगरपरिषद व ग्रामपंचायतींची बेफिकिरी

**दैनिक युवक आधार**
**उरण/ प्रतिनिधी**

उरण तालुक्यात गेल्या काही महिन्यांपासून भटक्या कुत्र्यांचा अक्षरशः धुमाकूळ सुरू आहे. नागरिकांच्या जीवावर संकट ओढवून आणणाऱ्या या गंभीर समस्येकडे प्रशासन मात्र ठार बेफिकीरपणे पाहत आहे. एप्रिल ते 20सप्टेंबर या काळात तब्बल 1164 नागरिकांना कुत्र्यांचा चावा बसल्याची धक्कादायक माहिती तालुक्याचे आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र इटकर आणि उरण इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. कालेल यांनी दिली आहे.

या कालावधीत मे महिन्यात 220, जुलै महिन्यात 266 तर ऑगस्ट महिन्यात तब्बल 274 नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याची आकडेवारी नागरिकांच्या अंगावर शहारे



आणणारी आहे. फक्त कुत्र्यांचा त्रासच नव्हे, तर या सहा महिन्यांत 24 नागरिकांना साप चावला, 9 जणांना विंचवाने डंख केला तर 22 जणांना इतर प्राण्यांनी चावा घेतला. परंतु सर्वाधिक भीषण वास्तव म्हणजे कुत्र्यांच्या चाव्यांचे प्रकरणे जिल्ह्यात उरणमध्येच सर्वाधिक नोंदवली गेली आहेत.

दरम्यान, कुत्र्यांच्या हल्ल्यांमुळे रुग्णालयांवर रुग्णांचा प्रचंड ताण निर्माण झाला आहे. कुत्रा चावण्यावरील लसींचा तुटवडा भासत असून नागरिकांना योग्यवेळी उपचार मिळण्यात अडथळे येत असल्याची गंभीर कबुली डॉ. कालेल यांनी स्वतः दिली आहे. म्हणजेच एका बाजूला भटक्या कुत्र्यांचे हल्ले सुरू आहेत, तर दुसऱ्या बाजूला नागरिकांना आवश्यक ती लसही उपलब्ध नाही. प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे आणि निष्क्रियतेचे हे ज्वलंत उदाहरण ठरते.

फक्त नगरपरिषदच नव्हे, तर गावोगावच्या ग्रामपंचायतींनीदेखील पूर्ण डोळेझाक केली आहे. सार्वजनिक रस्त्यावर, शाळा-कॉलेजांसमोर, बाजारपेठा व गल्लीबोळांमध्ये कुत्र्यांचे कळप मोकाट फिरत आहेत. शालेय विद्यार्थी, महिला, वृद्ध आणि लहान मुलं यांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामपंचायतींच्या आरोग्य समित्या, सरपंच आणि जबाबदार यंत्रणा मात्र गप्प बसलेली आहे. नागरिकांच्या जिवाशी चाललेला हा खेळ अक्षम्य गुन्हाच म्हणावा लागेल. आज उरण तालुक्यात "कुत्रा चावण्यात जिल्ह्यात अव्वल" अशी कलंकित नोंद झाली आहे. स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायती आणि आरोग्य यंत्रणांची ही बेफिकिरी लाजीरवाणी असून याविरुद्ध नागरिकांत तीव्र संताप व्यक्त होत आहे. जर प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलली नाहीत, भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण आणले नाही आणि लसींचा पुरेसा साठा उपलब्ध करून दिला नाही, तर जनतेच्या भावनांचा उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याचा सारासार विचार करून जिल्हा प्रशासनाने कुत्र्यावरील लस त्वरित उरण इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात उपलब्ध करून द्यावी, तसेच नगरपरिषद व ग्रामपंचायतींनी तातडीने मोकाट कुत्र्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी ठाम मागणी उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष घन:श्याम दामोदर कडू यांनी केली आहे.

# सेवा पंधरवडा 2025 च्या निमित्ताने सोमनाथपूर येथे स्वच्छता उपक्रम

## प्राचीन जगदंबा मंदिर परिसरात ग्रामस्थ व कार्यकर्त्यांचा सहभाग

**दैनिक युवक आधार**

**सोमनाथपूर,. उदगीर** : सेवा पंधरवडा 2025 च्या उपक्रमांतर्गत जिल्हाध्यक्षा श्रीमती उत्तराताई कलबुर्गे, हाळी हंडरगुळी मंडळाचे तालुका अध्यक्ष रामदास बेंबळे यांच्या सूचनेनुसार भाजपा महिला मोर्चा च्या तालुका अध्यक्षा शिवकर्णा अंधारे यांच्या नेतृत्वाखाली सोमनाथपूर येथील प्राचीन काळापासून प्रसिद्ध असलेल्या जगदंबा मंदिरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. मंदिराच्या सभोवतालचा परिसर, आवार व रस्त्यांची साफसफाई करण्यात आली.

या मोहिमेत सीमा सुर्यवंशी, सविता चव्हाण, मंगल चिलके, पुजा कुंभार, शांताबाई चव्हाण, लता कुंभार, अनंत बुंदे, ग्रामस्थ, युवक मंडळे, स्वयंसेवक, तसेच स्थानिक कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. मंदिर परिसरातील कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. तसेच मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी स्वच्छता राखण्याचे आवाहनही करण्यात आले.

सेवा पंधरवडा 2025 च्या उपक्रमांतर्गत उदगीर तालुका महिला मोर्चा च्या अध्यक्षा शिवकर्णा अंधारे यांच्या पुढाकाराने झालेल्या या अभियानामुळे मंदिर परिसर नवचैतन्याने उजळून निघाला. "स्वच्छ मंदिर – सुंदर गाव" हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.



# निफाड पंचायत समितीत गलथान कारभार

## घरकुल विभागाचा दरवाजाच दिवसभर बंद; गटविकास अधिकारी यांचे अधिकाऱ्यांवर नियंत्रण नाही









**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**निफाड** – निफाड पंचायत समितीतील प्रशासनाचा कारभार सध्या पूर्णतः गलथान झाला आहे. घरकुल विभाग हे याचे ठळक उदाहरण ठरत असून, विभागाचा दरवाजा अनेकदा दिवसभर बंदच असतो. नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी केल्या असल्या तरी, गटविकास अधिकारी (BDO) मात्र संबंधित अधिकाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचे आरोप आहेत.

घरकुल योजनेतून घर मिळवण्यासाठी अर्जदार अनेक वेळा कार्यालयात चकरा मारतात. मात्र दरवाजा बंद असल्याने त्यांना फक्त अपमानाचाच सामना करावा लागतो. ना कोणी उपस्थित, ना कुठलीही माहिती. लोकांच्या प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी कर्मचारी गायब असतात आणि गटविकास अधिकारी कोणतीही कार्यवाही करत नाहीत.

स्थानिकांनी या गलथान कारभाराची तक्रार वरिष्ठ पातळीवर नेण्याचा इशारा दिला आहे. "शासकीय योजनांचे लाभ मिळवण्यासाठी आम्ही दरवाजे झोडपतो आणि अधिकारी मात्र हवेतच असतात," अशी प्रतिक्रिया एक ज्येष्ठ नागरिकाने दिली.


प्रशासनाने या प्रकाराची तात्काळ दखल घ्यावी आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी सध्या ग्रामस्थांमधून होत आहे

> मी माझ्या कामानिमित्त पंचायत समिती येथे गेलो असता येथील घरकुल विभाग दरवाजा बंद होता ज्येष्ठ नागरिक व काही घरकुल लाभार्थी घरकुलची नोंद करण्यासाठी सकाळपासून पाच वाजेपर्यंत दरवाजा उघडण्याची वाट बघत होते त्यात गटविकास अधिकारी नम्रता जगताप यांच्याही ऑफिस बंद होते त्यानंतर मी सहाय्यक गटविकास अधिकारी सुनील पाटील यांना विचारणा केली त्यांनी सांगितले की ते कंत्राटदार म्हणून अधिकारी आहे त्यांनी रजा घेतलेली आहे की नाही हे मला सांगता येणार नाही अशा निष्काळजी अधिकाऱ्यांवर जिल्हा प्रशासनानी करावी
> **प्रतिक्रिया रामदास घायाळ**

> घरकुल विभागातील अधिकारी यांनी मला सांगितले होते ते सुट्टीवर आहे परंतु ऑफिस का बंद होते याची माहिती मी सोमवारी घेते
> प्रतिक्रिया:- गटविकास अधिकारी नम्रता जगताप

## विंचूर येथील -नेवगे वस्ती-सुभाषनगर रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी

**दैनिक युवक आधार**
**जनार्दन चव्हाण विंचूर प्रतिनिधी .**



विंचूर-नेवगे वस्ती-सुभाषनगर या मुख्य रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी येथील नागरिकांनी निवेदनाद्वारे केली आहे.

विंचूर येथील नेवगे वस्ती व सुभाषनगर परिसरातील नागरिकांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा आमदार छगनरावजी भुजबळ यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, विंचूर-नेवगे वस्ती-सुभाषनगर रस्ता पूर्णपणे खड्डेमय झाला असून रस्त्यावरून वाहने चालवणे कठीण झाले आहे. काही दिवसांपूर्वी या रस्त्याची डांबरीकरणाची कामे सुरू झाली होती, मात्र ठेकेदाराने केवळ 1 कि.मी. काम करून काम बंद केले आहे. उर्वरित रस्त्यावर काम झाले नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

या मार्गावरून शालेय विद्यार्थ्यांना दररोज प्रवास करावा लागतो. तसेच शेतकरी आपला माल बाजारपेठेत नेण्यासाठी याच रस्त्याचा वापर करतात. खड्डेमय रस्त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून शेतमाल ने-आण करण्यासही अडचणी निर्माण झाल्या आहेत. रस्त्याच्या खराब स्थितीमुळे स्थानिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या या निवेदनावर संदीप नेवगे, दीपक नेवगे, सोमनाथ नेवगे, विक्रम नेवगे, संजय नेवगे आदींसह अनेकांनी स्वाक्षऱ्या करून रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, "आमच्या दैनंदिन जीवनासाठी हा रस्ता महत्त्वाचा आहे. तरी प्रशासनाने या रस्त्याचे काम लवकर पूर्ण करून द्यावे."

स्थानिकांमध्ये अपेक्षा आहे की, आमदार छगन भुजबळ यांच्या प्रयत्नाने हा प्रश्न तातडीने मार्गी लागेल.

# राळेगाव येथे पत्रकार संरक्षण समिती नवीन कार्यकारणी निवड

## तालुकाध्यक्ष विशाल मासुरकर तर उपाध्यक्षपदी कैलास कोडापे व सचिवपदी जितेंद्र खोडे यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:- जितेंद्र खोडे**



राळेगाव:-पत्रकारांच्या हक्कांसाठी सातत्याने सक्रिय असलेल्या पत्रकार संरक्षण समिती राळेगाव व कळंब तालुक्याच्या नवीन कार्यकारणी गठीत करण्यात आली,पत्रकार संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष विनोद पत्रे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली गेली तर जिल्हा सहसचिव कविता धुर्वे यांना पदभार देण्यात आला,तर राळेगाव तालुकाध्यक्षपदी विशाल मासुरकर,तर उपाध्यक्षपदी कैलास कोडापे,व सचिवपदी जितेंद्र खोडे यांची नियुक्ती करण्यात आली.तर कळंब तालुकाध्यक्षपदी विरेंद्र चौहान तर उपाध्यक्ष पदी नितेश क्षिरसागर व सचिवपदी पवन जाधव यांची नियुक्ती करण्यात आली.तसेच सर्व पत्रकार बांधवाचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे संस्थापक अध्यक्ष विनोद पत्रे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "मागील तेरा वर्षापासून संरक्षण समितीने अनेक आयोजन केले असून, पत्रकारांच्या सन्मानासाठी सतत कार्यरत राहिली आहे. अडचणीत सापडलेल्या पत्रकारांसाठी धावून जाणारी ही संघटना आहे," असे ते म्हणाले.कार्यक्रमात अध्यक्षीय भाषण करताना तालुका उपाध्यक्ष कैलास कोडापे यांनी सांगितले की, "पत्रकार संरक्षण समिती ही संघटना नसून पत्रकारांचे कुटुंब आहे. कोणत्याही पत्रकारावर अन्याय झाल्यास आम्ही गप्प बसणार नाही. कोणताही गट, पक्ष न पाहता पत्रकारांच्या पाठीशी उभे राहणे हेच आमचे ध्येय आहे."नवीन पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत परिचय देऊन व्यक्त करत, संघटनेच्या कामात जबाबदारीने योगदान देण्याचे आश्वासन दिले.यावेळी निश्चल गौर(पत्रकार)रजत चांदेकर(पत्रकार),अमोल राऊत(पत्रकार),नरेश राऊत(पत्रकार), सुनिल करडे(पत्रकार),विवेक कुमरे(पत्रकार),मनोज जुमनाके(पत्रकार) अन्य पत्रकार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघटनेचे राळेगाव तालुका उपाध्यक्ष कैलास कोडापे तर सूत्रसंचालन जिल्हा सहसचिव कविता धुर्वे यांनी केले.

# आजही उरणचे रिक्षाचालक प्रमाणिक आहेत : डॉ.सत्या ठाकरे

## रिक्षा चालक नंदकुमार सवंगडे याच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**



आज दोनदिवसा पूर्वी उरण मधील सुप्रसिद्ध डॉ.सत्या ठाकरे यांच्या उरण शहराच्या प्रवेशव्दारावर असणाऱ्या हॉस्पिटलमध्ये सायंकाळच्या सुमारास महादेव पाटील नावाचे गृहस्थ पेशेंट म्हणून आले होते त्यांची पाया संदर्भात काही तक्रार होती. प्रथमिक पाहाणी नंतर त्यांना पायाची सोनोग्राफी करून घेण्यासाठीडॉक्टरानीत्यांना पाठवले होते. सोनोग्राफी करून ते डॉक्टर सत्या ठाकरे यांच्या हॉस्पिटलमध्ये परत आले. ज्या रिक्षात ते बसले होते घाई गडबडी मध्ये आणि पाय दुखण्याच्या त्रासा मुळे त्यांची पैश्या ची बॅग ते रिक्षा मध्ये विसरून खाली उतरले आणि हॉस्पिटल मध्ये आले.

थोड्या वेळात त्याना लक्षात आले की आपण बॅग रिक्षात ठेवली ती तिथेच राहली आणि त्यांना खूप टेन्शन आले ,एकतर आजाराने त्रस्त आणि त्यात पैसे हरवले असल्याने त्यांची मनस्थिती ढासळलेली होती.आशा परिस्थितीत ,डॉक्टर सत्या ठाकरे यांनी त्याना धीर दिला, व त्याना रिक्षा बद्दलची माहिती, आणि रिक्षा नंबरची विचारणा केली. पण त्यांना काहीच आठवत नव्हते आणि त्यांची मनस्तिथी ही ठीक नव्हती. आणि त्याच सुमारास तो रिक्षा चालक हॉस्पिटल मधे पैस्याच्या बॅगसह दाखल झाला त्या बॅगमध्ये 35 ते 40 हजार रुपयाची रोख रक्कम होती. तीत्याने महादेव पाटील याना सविनय परत केली. आजही जगात सच्चे आणि प्रामाणिक लोक आहेत, याची मनोमन खत्री महादेव पाटील यांना झाली.त्यावेळी महादेव पाटीलयांच्या सह डॉक्टर सत्याठाकरे यांनी त्या रिक्षाचालकाचे आभार मानले डॉक्टर म्हणाले आजही उरणचे रिक्षाचालक प्रमाणिक आहेत याचे हे जिवंत उदाहरण आहे. हा रिक्षाचालक उरण बोकडवीरा गावंतील असून या रिक्षा चालकाचे नाव आहे नंदकुमार सवंगडे असे आहेत्याच्या या प्रामाणिकपणा बद्दल सर्वस्थरातून त्याचे कौतुक होत आहे.

# माझा शेतकरी बाप

**दैनिक युवक आधार**
**- घाटंजी तालुका प्रतिनिधि . महेश पेन्दोर**

आज मी माझ्या शेतकरी बापाला न्याय मागण्यासाठी बोलत आहे.. हे आपल्या सर्वांना माहीत आहे. आज मी तुम्हाला फक्त बोलण्या साठी नाही , तर तुमच्याच मनातल्या वेदना, तुमच्याच भावना आणि तुमच्याच मागण्या मांडण्यासाठी बोलत आहे. मित्रांनो, आपण शेतकरी उन्हातान्हात दिवस-रात्र घाम गाळतो, मातीशी एकरूप होतो. पण आपल्या घामाचं मोल आपल्याला मिळत नाहीये. कापूस आणि सोयाबीन पिकवण्यासाठी आपण लाखो रुपये खर्च करतो, रात्रभर जागून पिकांची काळजी घेतो. पण जेव्हा हेच पीक बाजारात घेऊन जातो, तेव्हा त्याला कवडीमोल भाव मिळतो. हा कुठला न्याय आहे?

आज आपला शेतकरी कर्जाच्या डोंगराखाली दबलेला आहे. तो उत्पादन खर्चही काढू शकत नाहीये. नफा तर सोडाच, त्याला मूळ रक्कमही मिळत नाही. याच निराशा आणि हताशेतून आपला कापूस उत्पादक शेतकरी आत्महत्येच्या जाळ्यात अडकत आहे. हे चित्र बदलायचं असेल, तर आपल्याला एकजुटीने लढलं पाहिजे.

त्यामुळे, आज आपण या सरकारकडे काही ठोस मागण्या घेऊन आलो आहोत. या मागण्या नाहीत, तर हे आमचे अधिकार आहेत!

**आमची पहिली मागणी:**

सरकारने जाहीर केलेली किमान आधारभूत किंमत (MSP) ही आमच्या उत्पादन खर्चापेक्षा कमी आहे. आम्हाला कोणताही नफा मिळत नाही. त्यामुळे, सरकारने डॉ. एम. एस. स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी लागू कराव्या आणि C2 + 50% या सूत्रानुसार आम्हाला आमच्या पिकाचा भाव द्यावा. या सूत्रानुसार, आमच्या कापसाला प्रति क्विंटल ₹ १२,०००/- आणि सोयाबीनला प्रति क्विंटल ₹ ८,०००/- इतका भाव मिळालाच पाहिजे!

आमची दुसरी मागणी:

सरकार दरवर्षी MSP जाहीर करते, पण तो भाव मिळत नाही. त्यामुळे, सरकारने जाहीर केलेल्या MSP नुसार आमचा संपूर्ण शेतीमाल खरेदी करण्याची कायदेशीर हमी द्यावी. सरकारने बाजारात हस्तक्षेप करून आम्हाला योग्य भाव मिळवून दिलाच पाहिजे.

आमची तिसरी मागणी:

सरकार परदेशातून स्वस्त कापूस आणि सोयाबीन आयात करत आहे. त्यामुळे देशांतर्गत बाजारातील भाव खाली येत आहेत. ही आयात थांबवा! जोपर्यंत देशातील शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही, तोपर्यंत आयातीवर पूर्ण बंदी घाला!

**आमची चौथी मागणी:**

गेल्या काही वर्षांपासून बाजारात योग्य भाव न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. सरकारने या नुकसानीची भरपाई म्हणून प्रत्येक शेतकऱ्याला योग्य ती आर्थिक मदत जाहीर करावी.

**आमची पाचवी मागणी -**

महारष्ट्र जिल्ह्यातील सर्व तालुके शाह निशा करून अतिवृष्टी मुळे नुकसानग्रस्त घोषित करा

मित्रांनो, आज आपण फक्त आपल्यासाठी नाही, तर येणाऱ्या पिढ्यांसाठी लढत आहोत. हा लढा केवळ भावाचा नाही, तर हा लढा आपल्या सन्मानाचा आहे. आपण शांततेने आणि एकजुटीने आपला हक्क मिळवल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.

**माझा बाप शेतकरी**

# नवरात्रोत्सवात पावसाचा इशारा


## 18 ते 25 सप्टेंबरदरम्यान जादा बरसण्याचा हवामान खात्याचा अंदाज

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

**मुंबई** : संपूर्ण राज्यात सध्या पावसाने विश्रांती घेतली आहे. गेल्या दोन-तीन दिवसांतील मुसळधार पावसामुळे राज्यातील अनेक भागांतील पिकांचे नुकसान झाले आहे. त्याचबरोबर नैऋत्य मोसमी वाऱ्यांचा परतीचा प्रवासही सुरू झाला आहे. हवामान विभागाने जाहीर केलेल्या आठवड्यांच्या सुधारित अंदाजानुसार १८ ते २५ सप्टेंबर दरम्यान दक्षिण भारत, महाराष्ट्रासह गुजरातच्या काही भागांत जास्त पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. चार हवामान विभागाने १८ सप्टेंबर ते १६ ऑक्टोबर असा चार आठवड्यांचा सुधारित अंदाज जाहीर केला आहे. त्यानुसार पहिल्या आठवड्यात दक्षिण भारत, महाराष्ट्र आणि गुजरातच्या काही भागांत सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. दुसऱ्या आठवड्यात वायव्य भारत, मध्य भारत, पश्चिम भारताच्या तसेच ईशान्य भारतातील अनेक भागांत,

कर्नाटक, केरळच्या किनारी भागांत आणि तेलंगणामध्ये जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. तिसऱ्या आठवड्यात पूर्व भारत, उत्तर पूर्व भारत, उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि गुजरात येथेही सामान्यपेक्षा जास्त पावसाची शक्यता आहे.

> **ब्रह्मपुरी येथे सर्वाधिक तापमान**
> सध्या राज्यात पावसाने ओढ दिली आहे. परिणामी तापमानात वाढ झाली आहे. अनेक भागांत तापमान ३० अंशाच्या पुढे नोंदले गेले आहे. ब्रह्मपुरी येथे गुरुवारी सर्वाधिक तापमानाची नोंद झाली. तेथे ३५.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. त्याखालोखाल अकोला येथे ३२.५ अंश सेल्सिअस, अमरावती ३२.६ अंश सेल्सिअस, चंद्रपूर ३२.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.



> **पावसाचा अंदाज कुठे**
> मेघर्गजनेसह पाऊस नाशिक, अहिल्यानगर, सोलापूर, बीड, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, लातूर, धाराशिव, नागपूर, वर्धा

# लाडक्या बहिणीं'ना ई-केवायसीची सक्ती

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

मुंबईः लाडकी बहीण योजनेत शासकीय महिला कर्मचारी, पुरुष - लाभार्थी तसेच अडीच लाखांहून अधिक उत्पन्न असलेल्या महिलांनी तसेच एकाच कुटुंबातील दोनपेक्षा -अधिक महिलांनी लाभ घेतल्याची बाब समोर आली. यामुळे या योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या अपात्र महिलांची संख्या दिवसेंदिवस वाढत - आहे. गरजू महिलांच्या खात्यातच पैसे जमा व्हावेत यासाठी सरकारने आता लाडकी बहीण योजनेतील महिलांना ई-केवायसी करणे - बंधनकारक केले आहे.




ई-केवायसी केल्यानंतरच या - महिलांच्या खात्यात पुढील हप्ता जमा होणार आहे. विधानसभा निवडणूक काळात सरकारकडून लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली. या योजनेत दिवसेंदिवस अपात्र महिलांची संख्या वाढू लागली आहे.

विशेष म्हणजे १४ हजार २९८ पुरुषांनीही या योजनेचा लाभघेतल्याचे समोर आले. त्यामुळे आता सरकारकडूनच उपाययोजना करण्यात येत आहेत. यासाठीच लाडकी बहीण योजनेतील महिलांचे ई-केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. दोन महिन्यांच्या आत हे ई-केवायसी करायचे आहे, असे न करणाऱ्या महिला या योजनेस अपात्र ठरणार आहेत.

> कसे कराल प्रमाणीकरण ?
> 1 लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांनी https://ladakibahin.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन eKYC Banner वर क्लिक करायचे आहे. यानंतर आधार प्रमाणीकरण करण्यासाठीचा फॉर्म भरल्यानंतर ओटीपीच्या लिंकवर क्लिक करायचे आहे. त्यानंतर ईकवायसी आधी झाले आहे की नाही हे स्पष्ट होईल.
> 2 लाभार्थीचे नाव यादीत आहे की नाही याची तपासणी संकेतस्थळावर होईल. नसल्यास आधार क्रमांक मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र यादीत नाही असा संदेश मोबाइलवर येईल. पात्र असल्यास आधारशी जोडलेल्या मोबाईलवर ओटीपी येईल. हा ओटीपी टाकताच पती किंवा वडिलांचा आधार क्रमांक अर्जामध्ये भरावा लागेल.

# लोस्वराज्य संघटने कडून धर्माबादेत जेलभरो आंदोलन

## अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी आंदोलक आक्रमक

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी: गिरमाजी सुर्यकार**

लोकस्वराज्य आंदोलन या सामाजिक संघटनेकडून अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण यासह विविध मागण्यांसाठी संस्थापक अध्यक्ष प्रा. रामचंद्र भरांडे यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी (ता.19) रोजी राज्यभर जेलभरो आंदोलनाची हाक दिली होती. त्या अनुषंगाने धर्माबादेतही लोकस्वराज्य आंदोलनाचे प्रदेश उपाध्यक्ष व्ही. जी. डोईवाड यांच्या मार्गदर्शनाखाली समाज बांधव आक्रमक होऊन शुक्रवारी जेलभरो आंदोलन केले. या आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



मागील तीन ते साडेतीन दशकापासून लोकस्वराज्य आंदोलन महाराष्ट्र या सामाजिक संघटनेकडून तत्कालीन राज्य सरकारकडे वेळोवेळी आंदोलने, महामोर्चा, महापदयात्रा, मेळावे, आरक्षण परिषदा घेत अनुसूचित जाती आरक्षणाचे 'अबकड' असे वर्गीकरण करण्यात यावे. ही मागणी केली आहे. विद्यमान सरकारने अनुसूचित जाती आरक्षणाचे तात्काळ उपवर्गीकरण करण्यात यावे, क्रांतिवीर लहुजी साळवे अभ्यास आयोगाच्या 68 शिफारशींची तात्काळ अमलबजावणी करण्यात यावी, न्यायमूर्ती बदर समितीचा कालावधी सहा महिन्याहून एक महिन्याचा करण्यात यावा. यासाठी शुक्रवारी तहसील कार्यालय धर्माबाद येथून पोलीस स्टेशन पर्यंत लोकस्वराज्य आंदोलन यांच्या वतीने जेलभरो आंदोलन करण्यात आले. यावेळी राज्य शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करीत रॅलीद्वारे हलगी मोर्चा काढून जेलभरो आंदोलन केले. या आंदोलनात समाज बांधव व महिला मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

यावेळी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर, उपनिरीक्षक माधव लोणेकर यांनी पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# युवक आधार

मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : 13 रविवार दि. 21 सप्टेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 6


# परिणिता फाऊंडेशन मंगळागौरी 2025

## आमली पदार्थां वर सामाजिक संदेश देण्यात आला या कार्यक्रमाच्या माध्यमातून





















